संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 4 | Issue : 2 | Marathi Monthly | Thane, 1 August 2026 to 31 August 2026 | Pages 16 | Price : 10/-

## भिवंडीतील ‘सिम्प्रेस इंडिया’मध्ये धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचा आणखी एक उल्लेखनीय करार!





**भिवंडी : वाशेरे (भिवंडी) येथील मेसर्स सिम्प्रेस इंडिया प्रा. लि. या डिजिटल प्रिंटिंग क्षेत्रातील कंपनीत, अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही धर्मराज्य पक्ष प्रणित धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघातर्फे कामगारांच्या पगारवाढीचा करार यशस्वीरीत्या संपन्न झाला आहे. ज्येष्ठ कामगार नेते मा. राजन राजे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या करारानुसार, कंपनीतील ३५ कायम कामगारांना सरासरी रु. १२,९५८ (सुमारे रु. १३,०००) थेट पगारवाढ मिळणार आहे.**

गेल्या दहा वर्षांपासून केवळ ऑनलाईन ऑर्डरच्या माध्यमातून व्यवसाय करत, तोट्यातून हळूहळू नफ्याकडे वाटचाल करणाऱ्या कंपनीत अशा स्वरूपाचा करार होणे ही उल्लेखनीय बाब मानली जात आहे. करारानुसार दुसऱ्या वर्षापासून पगारवाढीपैकी ६० टक्के रक्कम बेसिक वेतनात व ४० टक्के रक्कम अलाउन्समध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे.

**याशिवाय, कामगारांना दरवर्षी ६ अतिरिक्त भरपगारी सुट्ट्या, दरवर्षी ३ गणवेश, तसेच कामगार व त्यांच्या पालकांचा मेडिक्लेम प्रीमियम कंपनीतर्फे भरण्याची महत्त्वाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, येत्या काही महिन्यांत ५ ते ६ कंत्राटी कामगारांना कायम सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून, भविष्यात कायम होणारे व संघटनेचे सभासद बनणारे कामगारही या करारातील सर्व लाभांसाठी पात्र असतील.**

अत्यंत आव्हानात्मक आर्थिक परिस्थितीतही कामगारहित जपत झालेल्या या करारामुळे सिम्प्रेस इंडिया कंपनीतील कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, कामगारांनी मा. राजन राजे व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे आभार व्यक्त केले आहेत.





**रोहा (जि. रायगड) : मे. अंशुल इनोव्हेटिव्ह केमिस्ट्री प्रा. लि. येथील कामगारांच्या बेमुदत संपाला १०० दिवस पूर्ण झाल्यानिमित्त, धर्मराज्य पक्ष प्रणित धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाशी संलग्न एलजी हिंग, मुंबई व प्रोटेगो, नवी मुंबई येथील कामगार सदस्यांनी संपकरी कामगारांना एलजी हिंग व प्रोटेगो युनिटकडून प्रत्येकी रु. २५,०००/- चा धनादेश प्रदान करून आर्थिक मदत केली.** या प्रसंगी न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या संपाला संघटित कामगार चळवळीचा ठाम पाठिंबा व्यक्त करण्यात आला. तसेच, कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घेऊन लवकरात लवकर समाधानकारक तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या आर्थिक मदतीमुळे संपकरी कामगारांना संघर्ष पुढे नेण्यासाठी बळ मिळाले असून, विविध उद्योगांतील कामगारांनी दाखविलेल्या ऐक्यभावनेचे हे उल्लेखनीय उदाहरण ठरले.




## दिल्लीतील जंतर-मंतर जनआंदोलनाला ‘धर्मराज्य पक्षा’चा पाठिंबा!

**दि. २० जुलै-२०२६ रोजी धर्मराज्य पक्षासह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तसेच विविध सामाजिक, कामगार, विद्यार्थी व राजकीय संघटनांच्या संयुक्तवतीने ठाणे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केंद्र सरकारला निवेदन सादर करण्यात आले.** ...पृष्ठ क्र. २ वर

अंतरंग



विद्यार्थी आंदोलन: तेव्हा संवाद, आता दडपशाही?
पृष्ठ क्र. ३



... तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?
..हेमंत कर्णिक
पृष्ठ क्र. ८



मुस्लिम स्त्रियांचा संघर्ष : धर्म, पितृसत्ता आणि आधुनिकतेच्या उंबरठ्यावर
जगदीश काबरे
पृष्ठ क्र. १०



रामराज्यात चौकीदार चोर!
ज्ञानेश महाराव
पृष्ठ क्र. १३

# समाजसेविका रश्मीता पोपेटा यांचे उपोषण

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते स्व. दि. बा. पाटील साहेब यांचे नाव देण्याची मागणी




## ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे जाहीर पाठिंबा

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते स्व. दि. बा. पाटील साहेब यांचे नाव देण्यात यावे, या न्याय्य आणि जनभावनांशी निगडित मागणीसाठी समाजसेविका रश्मीता पोपेटा यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषण आंदोलनास ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे जाहीर पाठिंबा देण्यात आला.**

यावेळी ‘धर्मराज्य पक्षा’चे सचिव नरेंद्र पंडित यांनी पक्षाचे समर्थनपत्र आंदोलनस्थळी सुपूर्द केले. तसेच ‘धर्मराज्य पक्षा’चे प्रवक्ते समीर चव्हाण, कामोठे येथील धर्मराज्य पक्षाचे पदाधिकारी महेंद्र म्हात्रे विजय म्हात्रे, बाबुराव भगत व इतर कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून आंदोलनास नैतिक व वैचारिक पाठिंबा व्यक्त केला.

‘धर्मराज्य पक्षा’ची सुरुवातीपासूनच ठाम भूमिका आहे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांचेच नाव देण्यात यावे. हा केवळ नामकरणाचा विषय नसून भूमिपुत्रांच्या संघर्ष, त्याग आणि अस्मितेचा सन्मान आहे.

शासनाने जनभावनांचा आदर राखून ही न्याय्य मागणी तात्काळ मान्य करावी, अशी ‘धर्मराज्य पक्षा’ची आग्रही मागणी आहे.



**पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसीजवळील कोंढापुरी येथील सुल्झर इंडिया प्रा. लि. या बहुराष्ट्रीय कंपनीत धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष तसेच सुल्झर इंडिया कामगार युनियनचे मार्गदर्शक मा. राजन राजे यांची युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट घेतली.**

यावेळी संघटनेचे अध्यक्ष सागर धुमाळ, सेक्रेटरी स्वप्नील शेळके, कार्याध्यक्ष किरण देरकर, उपाध्यक्ष प्रशांत माने, खजिनदार प्रवीण शेळके, मिलिंद पिंगळे, मंगेश गायकवाड, अजय निळकंठ तसेच इतर सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

या भेटीदरम्यान कामगारांच्या विविध प्रश्नांवर, संघटनेच्या आगामी वाटचालीवर, कामगार हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांवर तसेच संघटना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सविस्तर चर्चा करण्यात आली. कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित प्रयत्न अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

धर्मराज्य पक्ष प्रणित धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ व सुल्झर इंडिया कामगार युनियन यांच्या माध्यमातून कामगार हितासाठीची लढाई अधिक जोमाने पुढे नेण्याचा संकल्प!




## दिल्लीतील जंतर-मंतर जनआंदोलनाला ‘धर्मराज्य पक्षा’चा पाठिंबा! ...पृष्ठ क्र. १ वरुन

NEET पेपरफुटी प्रकरणामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर निर्माण झालेल्या संकटाबाबत, तसेच लेह-लडाखच्या पर्यावरण संरक्षणासाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या जनआंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी या निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

यावेळी धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष श्री. राजन राजे म्हणाले, ‘‘लोकशाहीत जनतेच्या प्रश्नांना उत्तर देण्याचा मार्ग दडपशाही नव्हे, तर संवाद आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्न असो किंवा पर्यावरण संरक्षणाचा विषय असो, केंद्र सरकारने आंदोलनकर्त्यांशी तात्काळ चर्चा करून त्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवणे आणि देशाच्या पर्यावरणाचे संरक्षण करणे ही सरकारची संविधानिक जबाबदारी आहे.’’

**धर्मराज्य पक्षाचा स्पष्ट विश्वास आहे की, विद्यार्थ्यांना न्याय, पर्यावरणाचे संरक्षण आणि लोकशाही मूल्यांचे जतन ही कोणत्याही सरकारची सर्वोच्च जबाबदारी आहे. आंदोलनकर्त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष न करता केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, हीच आमची ठाम भूमिका आहे.**

या निवेदनावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), धर्मराज्य पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय (NAPM), भारत जोडो अभियान, श्रमिक जनता संघ, आयटक, बहुजन विकास संघ, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कायद्याने वागा लोकचळवळ, अन्न अधिकार अभियान, भारतीय कम्युनिस्ट पार्टी (CPI), डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटर्स असोसिएशन, गावठाण-कोळीवाडे-पाडे संवर्धन समिती तसेच अंगणवाडी व आशा वर्कर संघ यांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थी आंदोलन : तेव्हा संवाद, आता दडपशाही ?

**विरोधात असताना अभाविप/भाजपने असंख्य आंदोलनं केली आहेत. आंदोलनं करण्याचा, आंदोलकांच्या बाजूचा भक्कम अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. असा पक्ष सत्तेत असताना, विशेषत: विद्यार्थी आंदोलनांना जास्त सहृदयतेनं सामोरा जाऊ शकला असता असं वाटतं. ते त्यांनी केलं नाही. त्याची परिणती सीजेपीच्या जंतर–मंतरवरच्या आंदोलनादरम्यान झालेल्या गदारोळात झाली. ३५ वर्षांपूर्वी तेव्हाच्या पंतप्रधानांच्या घरासमोर आंदोलन केलेल्या अभाविपच्या ज्या कार्यकर्त्याने, 'या सरकारनं चुकीच्या पद्धतीने हे आंदोलन हाताळलं' असं मत व्यक्त केलंय त्या प्रसाद शिरगावकर लिखित 'तेव्हा आणि आता' या लेखातील महत्त्वाचा संकलित अंश...**

मी १९९० सालच्या काश्मीर बचाव आंदोलनात भाग घेतला होता. जेमतेम १६–१७ वर्षांचा विद्यार्थी होतो मी तेव्हा. देशात काहीतरी सकारात्मक बदल घडला पाहिजे, या तळमळीने त्या आंदोलनात उडी मारली होती. देशभरातून आम्ही दहा–बारा हजार विद्यार्थी जम्मूमध्ये जमलो. तिथून पुढे उधमपूरपर्यंत गेलो. उधमपूरमध्ये आम्हाला अटक झाली. आम्हाला जम्मूच्या तात्पुरत्या तुरुंगामध्ये ठेवलं. मी त्या तुरुंगात दोन रात्री काढल्या. तिथून आम्हाला सोडल्यावर आम्ही सगळे दिल्लीला आलो. तिथं तेव्हाच्या पंतप्रधानांच्या घरासमोर आम्ही निदर्शनं करायला बसलो. पंतप्रधानांचे प्रतिनिधी आम च्यासमोर आले. आमच्याशी चर्चा केली. **आमचं निवेदन स्वीकारलं आणि त्यावर आम्ही नक्की काम करू, असं आश्वासन दिलं. मग आम्ही आमचं आंदोलन आटोपून आपापल्या घरी परत आलो. देशभरातून जम्मूला जाताना, जम्मूहून उधमपूरला जाताना, उधमपूरला आम्हाला अटक करताना, पुढे दोन दिवस तुरुंगात ठेवलेले असताना, नंतर दिल्लीला पंतप्रधानांच्या घरासमोर निदर्शनं करताना कुठेही, कधीही पोलिसांनी आमच्यावर लाठीहल्ला केला नाही, अश्रुधूर सोडले नाहीत आणि कोणत्याही प्रकारची मारहाण आणि जबरदस्ती केली नाही. आम्हा कोवळ्या विद्यार्थ्यांना कोणीही 'देशद्रोही' म्हटलं नाही. 'परदेशातून फंडिंग मिळतंय, म्हणून करतायत' असंही म्हटलं नाही. 'विद्यार्थी आहेत; त्यांना देशासाठी जे करावं असं वाटतंय, ते करतायत', असाच एकूणच सूर होता.**

माझा भारताच्या लोकशाहीवरचा विश्वास हा त्या कोवळ्या वयात या आंदोलनात भाग घेतल्याने दृढ झाला होता. आयुष्यातलं विशीच्या आसपासचं वय हे आपल्या राजकीय भूमिकेची जडणघडण होण्याचं वय असतं. आपल्या मागण्यांसाठी आंदोलनं करण्याची बीजं रुजण्यासाठी हे वय ही अत्यंत सुपीक जमीन असते. त्या वयात मन आदर्शवादानं भारावलेलं असतं. स्वत:च्या आणि देशाच्या भविष्याविषयी अनंत स्वप्नं हृदयात असतात. त्या स्वप्नांच्या आणि आपल्या मनातल्या आदर्श जगाच्या आड जे कोणी येत आहे त्यांच्याविषयी विलक्षण चीड मनात असते. आणि 'व्यवस्थे'विरुद्ध लढण्याची ताकद आपल्या मनगटात आहे, असं वाटत असतं. त्यामुळे विद्यार्थी आंदोलनं ही नेहमीच अत्यंत ऊर्जामय, उत्कट आणि भावनिक असतात.

माझ्या विद्यार्थी दशेतील राजकीय आंदोलनाच्या अनुभवा



नंतरच्या ३५ वर्षांमध्ये दिल्लीतल्या यमुनेतून बरंच पाणी वाहून गेलं आहे. आज जंतर–मंतरवर सुरू असलेलं विद्यार्थी आंदोलन माझ्या मुलाच्या पिढीचं आहे. राजकीय भूमिका घडण्याच्या वयात ते हे आंदोलन करत आहेत. त्यांच्या भविष्यासाठी आणि त्यांच्या मनातल्या आदर्श देशा–जगासाठी ते हे आंदोलन करत आहेत. आणि त्यांच्या वयानुसार हे अत्यंत ऊर्जामय, उत्कट आणि भावनिक आंदोलन आहे.

सध्याचं विद्यार्थी आंदोलन सरकारनं अत्यंत चुकीच्या पद्धतीने हाताळलं हे आपल्यासमोर येत आहे. आधी सरकारने हे आंदोलन उभंच राहू नये यासाठी प्रयत्न केले. सीजेपीची समाजमाध्यम खाती बंद करणं, हा पहिला उपाय करून झाला. त्यानंतर ज्या ज्या शहरांमध्ये आंदोलनं होणार होती तिथे तिथे जमावबंदी लावली. **आंदोलनस्थळी शेकडो पोलिसांचा फौजफाटा उभा केला. जंतर–मंतरवर आंदोलन सुरू झालं तेव्हा काय घडलं ते आपण सगळ्यांनी बघितलंच. त्या भागातलं इंटरनेट बंद करणं, मेट्रो स्टेशन्स बंद करणं इत्यादींपासून ते आंदोलकांवर लाठीहल्ला करणं आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडण्यापर्यंत सर्व मार्ग वापरले सरकारने. सरकारने हे सर्व कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या हेतूनेच केलं असावं. पण इतके टोकाचे उपाय करण्याची गरज होती का हा प्रश्न राहतो.**

आमचं ३५ वर्षांपूर्वीचं विद्यार्थी आंदोलन आता फारच बाळबोध वाटत आहे मला. अर्थात, माझ्या त्याकाळच्या आंदोलनाच्या अनुभवावरून संपूर्ण काळाचं सरसकटीकरण करणं बरोबर नाही हेही मला माहीत आहे. मात्र एक वाटतं, मी ज्या संघटनेमधून या आंदोलनाला गेलो होतो (अभाविप), त्या संघटनेचा मातृपक्ष (भाजप) आज सत्तेत आहे. **विरोधात असताना अभाविप/भाजपने असंख्य आंदोलनं केली आहेत. आंदोलनं करण्याचा, आंदोलकांच्या बाजूचा भक्कम अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. असा पक्ष सत्तेत असताना, विशेषत: विद्यार्थी आंदोलनांना जास्त सहृदयतेनं सामोरा जाऊ शकला असता असं वाटतं. ते त्यांनी केलं नाही, त्याची परिणती सीजेपीच्या जंतरमंतरवरच्या आंदोलनादरम्यान झालेल्या गदारोळात झाली आहे.**

या आंदोलनात जे घडलं त्याचा आढावा घेऊन, त्यावरून आत्मपरीक्षण करून, सरकार भविष्यातल्या विद्यार्थी आंदोलनांना सहृदयतेने आणि संतुलितपणे सामोरं जाईल अशी आशा आहे.

*– समाजमाध्यमातून साभार*

**''तेव्हाही तेच दिल्ली पोलिस, आजही तेच दिल्ली पोलिस...फरक इतकाच की, तेव्हा योग–प्राणायाम–आयुर्वेदाचा धंदा करणारा 'रामदेवबाबा' होता आणि आज एक समाजहितैषी शास्त्रज्ञ–पर्यावरणतज्ज्ञ 'सोनम वांगचूक' आहे!''**

...तेव्हा, भाजप-संघीय 'दलाल' असलेला डरपोक रामदेवबाबा, जीवाच्या भितीने बायकांची वस्त्रे लपेटून मंचावरुन खाली उडी मारुन धूम पळाला होता; तर, आज जीवाचा करार करुन, दिल्ली पोलिसांपुढे सोनम वांगचूक मरणासन्न अवस्थेत लढत राहिला...हाच फरक असतो...नेभळट, नाकाम, विद्वेषी स्वभावाच्या ढोंगी संतांमध्ये आणि खऱ्या संत-सज्जनशक्तिमध्ये! गंगामातेचं रक्षण करण्याच्या पवित्र कार्यासाठी १११ दिवस आमरण उपोषण करणारे IIT-Kanpurचे प्राध्यापक व पर्यावरणतज्ज्ञ प्रो. जी. डी. अग्रवाल (स्वामी ज्ञानस्वरुप सानंद) असेच पोलिसांशी अखेरपर्यंत लढले होते. वामी ज्ञानस्वरुप सानंद व इतर डझनावरी जाज्वल्य संतांचे; ''माँ गंगा मुझे बुला रही है'' असं, 'गंगामैय्याच्या प्रेमा'चं ढोंग बेमालूम वठवणाऱ्या नरेंद्र मोदी सरकारने, बिनदिक्कतपणे बळी घेतले होते... आता, पाळी आहे ती 'सोनम वांगचूक' यांची, एवढंच!

''सोनम वांगचूक यांना जबरदस्तीने उचलताना पांढऱ्या चादरीचा वापर केला गेला; म्हणजे, दिल्ली पोलिस, मंचावरच्या कुणाचं लग्न लावायला आले होते की, कुणाचे अंत्यसंस्कार करायला, संघीय भटजी घेऊन गेले होते?''

...हा केवळ, ''लोकशाहीचाच खून नव्हे; तर, भारतमातेवर केला गेलेला अत्याचार आहे''...तरीही, हे भाजप-संघीय लोकं तोंडाने बेशरमपणे म्हणत रहातील... ''भारत माता की जय''!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## अंधभक्तांनो, खालील प्रश्नांची प्रामाणिकपणे उत्तरे द्याल काय ?

- साईबाबा, गजानन महाराज, स्वामी समर्थ या तथाकथित संतांनी समाजाला कोणत्या प्रकारचा बुद्धिप्रामाण्यवाद शिकवला ?
- त्यांनी नामदेव, तुकाराम महाराज, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांच्यासारखे समाज प्रबोधन केले का ?
- भक्तांनी फक्त अंधश्रद्धा पसरवणाऱ्या कथाच फेसबुक, व्हॉट्सअपसारखी समाजमाध्यमे आणि पोथ्यांमधून का पसरवल्या ?
- साईबाबा, गजानन महाराज, स्वामी समर्थ हे महाभाग पृथ्वीतलावर प्रकटले मग त्यांना नाळेची खूण असलेली बेंबी कशी ? त्यांचे पालक कोण ?
- गांजा किंवा तंबाखू चिलिमीत टाकून ओढणे आरोग्यास हानिकारक आहे हे ज्याला माहित नाही तो शहाणा कसा ? त्याला संत का म्हणावे ?
- अंधभक्तांनो, तुमच्या मुलाबाळांनी चिलीम ओढण्याची नशा केली तर तुम्हाला चालेल काय ?

***...जगदीश काबरे***

# हजारो वर्षांचा मान्सून बदलतोय; एल निनो नव्हे, मानवनिर्मित तापमानवाढ आहे खरी चिंता!

हजारो वर्षांच्या मान्सूनचे गायब होणे, एल निनो, आणि आपल्याला लवकरच नष्ट करणार असलेली आपणच घडवलेली पृथ्वीची तापमानवाढ.

**उशीरा का होईना पण शेवटी मान्सून आला आहे, असं प्रसारमाध्यमे, हवामान खात्याचा निर्वाळा देऊन सांगत आहेत. फक्त त्याच्या आदल्या दिवसापर्यंत मान्सूनला अजून दहा–पंधरा दिवस लागतील असे सांगितले जात होते. मग तो अचानक कसा आला?**

खरी गोष्ट ही आहे की, मान्सून आलेला नाही. एवढेच नाही तर गेल्या वर्षी देखील मान्सून आलाच नाही. गेल्या वर्षी मुंबईत ७ जून ऐवजी ७ मे ला पाऊस सुरू झाला, तो देखील मुसळधार. ही नैऋत्य मान्सूनची पध्दत नव्हती. हजारो वर्षांपासूनचा निसर्गाचा एक महत्त्वाचा अविष्कार गेल्या वर्षी गायब झाला. सन १९८० सालातच पृथ्वीवरील ऋतुचक्र तापमानवाढीमुळे मोडले आहे. तेव्हापासून मान्सून व इतर ऋतुंचे वेळापत्रक मोडले. आता मान्सूनच गेला.

गेल्या वर्षी, सन २०२५ मध्ये एक अत्यंत महत्त्वाची घटना घडली आहे. या वर्षी पृथ्वीच्या सरासरी तापमानात सन १७५६ च्या म्हणजे पृथ्वीवर वाफेचे इंजिन हे पहिले स्वयंचलित यंत्र येण्याच्या वर्षाच्या तुलनेत ३° से ची वाढ झाली. तापमानवाढीने अजून एक धोक्याचा टप्पा ओलांडला. हवामान खाते म्हणते की गेल्या वर्षी चांगला म्हणजे ९६ ते ९८% पाऊस पडला. पण प्रत्यक्षात गेल्या वर्षी ३००% म्हणजे तिप्पट पाऊस पडला. हे निसर्गाचे असाधारण वर्तन होते. परंतु एवढा पाऊस पडूनही यावर्षी पाणी साठे कोरडे पडले आहेत. याचे कारण महाविस्फोटक तापमानवाढ आहे. पाण्याची वेगाने वाफ झाली. बाष्पीभवन व वाळवंटीकरणाचा वेग वाढता आहे.

गेल्या वर्षी पाऊस नैऋत्य दिशेने आला नव्हता. मे ते ऑक्टोबर या सहा महिन्यांत पूर्वेकडून बंगालच्या उपसागरातून ओडिशाकडून, भारताच्या मध्य भागातून पश्चिमेकडे महाराष्ट्र व गुजरातच्या दिशेने अरबी समुद्राकडे पावसाळी ढग जात राहिले.

हे असाधारण वर्तन पृथ्वीच्या तापमानात होत असलेल्या अकल्पनीय वाढीमुळे आहे. दि. २३ मार्च २०१७ या जागतिक हवामान दिनी आलेला, जागतिक हवामान संघटनेचा अहवाल म्हणतो की, "बदलत्या हवामानाबाबतचे आमचे आकलन संपले आहे, आपण खरोखर अज्ञात प्रदेशात शिरलो आहोत. आता असाधारण हेच सर्वसाधारण आहे. NOW, ABNORMAL IS NEW NORMAL.

गेल्या काही दिवसांत देशात सर्वत्र उन्हाळा भाजून काढत असताना वाळवंटमय राजस्थानमध्ये विक्रमी पाऊस पडला, यातून हेच दिसते. गेल्या वीस वर्षांत उन्हाळा भाजतो, पावसातही गरम होते, थंडीत हवा पूर्वीप्रमाणे हुडहुडी भरवणारी कोरडी नसते, आर्द्रता, बाष्प यामुळे बर्फाळ हाडं, रक्त गोठवणारी असते. निसर्गाबद्दल संवेदनाशील माणसांना हा फरक समजतो.



उष्णतेच्या लाटा आणि पृथ्वीवरील पाणी व बर्फाच्या अविरत होणाऱ्या वाफेमुळे वाळवंटातील देशांसह सर्व जगात होत असलेली ऐतिहासिक अतिवृष्टी व बर्फवृष्टी या तापमानवाढीच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रचंड कार्बन उत्सर्जन व कार्बन शोषणाऱ्या हरितद्रव्याचा नाश घडवणारे औद्योगिकीकरण तापमानवाढीला जबाबदार आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघाची 'जागतिक हवामान संघटना', पृथ्वीवर सुमारे साडेतीन हजार ठिकाणांवरून क्षणोक्षणी माहिती टिपत असते. अशा स्थितीत ती संघटना, बदलत्या हवामानाबाबत हात वर करत असताना, त्यांच्या तुलनेत नगण्य ज्ञान असलेले आपले हवामान खाते, मान्सूनच्या आगमनावर निरर्थक दावे करण्याचे धाडस दाखवते. अमेरिकेची 'नासा' व 'वातावरण प्रशासन' या संस्था तसेच प्रशांत महासागरातील 'मौना लोआ' येथील 'हवाई विद्यापीठ' या दीर्घकाळ संशोधन करणाऱ्या सर्वोच्च वैज्ञानिक संस्था धोकादायक परिस्थितीबाबत गेली काही दशके इशारे देत आहेत.**

सध्या युरोपमध्ये उष्णतेची अभूतपूर्व लाट चालू आहे. अनेक ठिकाणी तापमान ४०°से च्या वर जात आहे. शेकडोंचा मृत्यू झाला. गेल्या काही दिवसांतील तापमान, शहर व देश पुढीलप्रमाणे आहे. ४८° माद्रिद – स्पेन, ४६° झारागोझा–स्पेन, ४६° पॉइटिअर– फ्रान्स, ४५.१° अँड्युजार – स्पेन, ४४° रोम – इटाली.

१°ने तापमान वाढले तर विशेष काय झाले? असे काहींना वाटते. एका ग्रहाचे तापमान या गतीने वाढणे ही कल्पना कथा, कादंबरी किंवा चित्रपट यामध्ये देखील येत नाही. सुमारे १५० वर्षांपूर्वीपर्यंत युरोपचे उच्चतम तापमान १०° ते १५° च्यावर जात नव्हते. मुंबईच्या ब्रिटिश काळातील १४० वर्षांपूर्वीच्या राजपत्राप्रमाणे मुंबईचे सर्वाधिक तापमान २५° होते. २०२० सालात पृथ्वीचे सरासरी तापमान २° ने वाढले तेव्हा युरोपचे व दोन्ही ध्रुवांचे उच्चतम तापमान ३०° ते ३५° ने वाढले. मुंबईचे उच्चतम तापमान ४५° नोंदवले गेले. सरासरी तापमान १° ने वाढले तर सर्वाधिक उष्णतेच्या लाटेत काही ठिकाणी तापमान आता ५०° ते ७०° पर्यंत पोचते.

**उष्णतेच्या लाटा आणि पृथ्वीवरील पाणी व बर्फाच्या अविरत होणाऱ्या वाफेमुळे वाळवंटातील देशांसह सर्व जगात होत असलेली ऐतिहासिक अतिवृष्टी व बर्फवृष्टी या तापमानवाढीच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रचंड कार्बन उत्सर्जन व कार्बन शोषणाऱ्या हरितद्रव्याचा नाश घडवणारे औद्योगिकीकरण तापमानवाढीला जबाबदार आहे.**

माणसाची जिवंत राहण्याची मर्यादा सुमारे ५०° तापमान आहे. यातून तापमानवाढ अपरिवर्तनीय होणे, सतत तापमान वाढणे म्हणजे साक्षात मृत्यू. मानवजात व जीवसृष्टी वाचवण्यासाठी ताबडतोब पृथ्वीला, निसर्गाला शरण जावे असे विज्ञान सांगत आहे. मोटार, विमान, टीव्ही, कॉम्प्युटर, धुलाई यंत्र, ए सी, सिमेंट, वीज इ. सर्व शेकडो वस्तू हे तंत्रज्ञान आहे, विज्ञान नाही. विज्ञान सत्य सांगते, तंत्रज्ञानाचे तसे नाही.

जगात प्रथम स्वयंचलित यंत्र वापरणाऱ्या युरोपने त्यासाठी इंधन म्हणून १८ व १९ व्या शतकात तेथील जंगलांची आहुती दिली व अमाप कार्बन उत्सर्जन केले. त्याची फळे आता युरोप भोगत आहे. याला प्रगती, विकास म्हटले गेले. विकसित देश तेथील श्रीमंती आणि तंत्रज्ञानामुळे तापमानवाढीला तोंड देऊ शकतात, हा भ्रम आहे. शून्याजवळ तापमान असणारा युरोप आज भाजून निघत आहे. निसर्ग टिकून असलेल्या देशांना अविकसित व मागास असा शिक्का मारणे अयोग्य आहे, उलट हेच भूभाग कार्बन शोषून घेऊन जगाला वाचवत आहेत.

स्वयंचलित यंत्राची भूक पृथ्वी भागवू शकत नाही. उद्योग, वाहतूक, बांधकाम, रासायनिक–यांत्रिक शेती, वीजनिर्मितीसाठी युरोपने भारतीय उपखंडासह जगाचे अमर्याद शोषण केले. जेते श्रेष्ठ असतात या गैरसमजामुळे स्वतंत्र झालेल्या देशांनी युरोपचे अंधानुकरण सुरू केले. खंत वाटते की जगाला दिशा देऊ शकणारा भारतदेखील या वाटेने गेला. विकसितपणाची व्याख्या चुकली आहे. युरोप अमेरिका जगाला रक्षणाचा मार्ग दाखवू शकत नाही. ते चीन वा इतर कुणी देश तापमानवाढ थांबवू शकणार नाही आणि तापमानवाढ व हवामान बदलाशी जुळवून घेऊ व मात करू, या म्हणण्याला काही अर्थ नाही, तसे शक्य नाही.

जागतिक हवामान संघटनेच्या सन २०१७ मधील अहवालाप्रमाणे तापमानवाढ महाविस्फोटक बनल्यामुळे ज्यावर सजीवांचे जिवंत असणे जोडलेले असते ते पर्यावरणीय पट्टे दरवर्षी सुमारे ३५ मैल या गतीने विषुववृत्तापासून ध्रुवांकडे सरकत आहेत. या गतीने सजीवांच्या प्रजातींना स्थलांतर करणे वा स्वतःमध्ये बदल करून घेणे शक्य नाही. आता रोज शेकडो प्रजाती नष्ट होत आहेत. एका प्रजातीत असंख्य सजीव असतात. म्हणून तापमानवाढीवर तंत्रज्ञान वा पैशाच्या आधारे उपाय करता येईल या भ्रमात कुणी राहू नये. हा आमचा विषय नाही असेही कुणी म्हणू नये. आपण श्वास ...पृष्ठ क्र. ५ वर

...पृष्ठ क्र. ४ वरुन
घेतो, अस्तित्व अनुभवतो ही पृथ्वीची देणगी आहे. तिच्याशी कृतज्ञ राहून, जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी या प्रश्नावर काम करणे हे आपले कर्तव्य ठरते.

युरोपच्या जवळ उत्तर आफ्रिकेत ट्यूनिशिया देशातील 'ट्यूनिस' शहरात ४९° से तापमान नोंदले गेले. पुढील दोन महिन्यांत तापमान अजून वाढू शकते. यावर्षी एल निनो वर खापर फोडले जात आहे. 'एल निनो' हा ६ ते ११ वर्षांनी उसळणारा प्रशांत महासागरात हजारो वर्षे घडत असलेला अविष्कार आहे. त्याची तीव्रता तापमानवाढीमुळे वाढते. पण त्यापेक्षा मानवनिर्मित संकट मोठे व न थांबणारे आहे. 'एल निनो' गेला की, पुढील वर्षी सर्व ठीक होईल अशा भ्रमात जनतेला ठेवले जात आहे.

सन २०१४ पासून पृथ्वीचे सरासरी तापमान सतत दरवर्षी ०.२० म्हणजे पाच वर्षांत १०°से या धक्कादायक गतीने वाढत आहे. जागतिक हवामान संघटनेने ६ नोव्हेंबर २०१७ रोजी बॉनमध्ये घेतलेला खास परिषदेत तापमानवाढ अपरिवर्तनीय झाल्याचे, म्हणजे तापमान सतत वाढणार असल्याचे जाहीर केले. सन २०२० मध्ये सरासरी तापमानात २०°से ची वाढ झाली आणि पॅरिस येथे डिसेंबर २०१५ मध्ये जगातील सर्व राष्ट्रप्रमुखांनी मानवजात व जीवसृष्टीच्या रक्षणासाठी, कार्बन कमी करण्यासाठी केलेला करार अयशस्वी ठरला. पृथ्वीवर महासागरात विषुववृत्त व ध्रुवांमध्ये उष्णतेचे वहन व त्याद्वारे अनेक कार्य करणारा पट्टा (conveyor belt) तापमानवाढीमुळे मंद होत बंद पडण्याच्या मार्गावर आहे असे दिसत आहे. याच्या बंद पडण्याने पृथ्वीवर पर्यावरणात मोठी उलथापालथ होऊन जीवन संपुष्टात येणे अतिजलद होईल. अचानक पृथ्वीव्यापी वणवे किंवा बर्फवृष्टी होऊ शकते. अमेरिकेत या वर्षी हिवाळ्यात बहुतांश भूभागावर झालेल्या विक्रमी बर्फवृष्टीने याची चुणूक दिसली आहे.

भाजून काढणाऱ्या, घराबाहेर पडूही न देणाऱ्या, शरीराला शोषणाऱ्या, पाणी काढून टाकणाऱ्या अधिकाधिक उष्णतेचा अनुभव लोक दरवर्षी घेत आहेत. वाढते उष्माघात, इंद्रिये निकामी होणे, अर्धांगवायू, हृदय-मेंदूचा झटका, थकवा, अस्वस्थता, ताप, उलट्या, बेचैनी, मानसिक तणाव, निद्रानाश, असंतुलित वर्तन, हे काहीतरी वेगळे घडत आहे असे अनेकांना जाणवत आहे, परंतु ही उष्णता सतत वाढत राहणार आहे हे त्यांना माहीत नसावे. होईल पुढे सर्व ठीक, अशा कल्पनेत ते आहेत.

**आपणाला न आवडणारे काही ऐकावे अशी १९९० पासून बहुतेकांची मानसिकता नाही. आपल्याला अमेरिकेप्रमाणे वस्तुंची व कृत्रिम सुखसाधनांची रेलचेल असलेले, वापरा आणि फेका पद्धतीचे धुंद जीवन जगायला मिळणार असा समज पसरवला गेला. मानवजात राजकारण, युद्ध, मनोरंजनात इ.मध्ये मग्न आहे. प्रगती, विकासाचा मनावर पगडा आहे. त्यामुळे वास्तवाचा विचार थांबला आहे.**

वाढत्या भौतिक सुखसोयीं म्हणजे विकसित दर्जा ही रूढ कल्पना. हा प्राप्त करण्यातच वाढता कार्बन आणि त्याला शोषणाऱ्या हरितद्रव्याचा नाश सामावला आहे. पाच वर्षांत १० या गतीने वाढणाऱ्या उष्णतेत पुढील दशकातच जीवन टिकणे शक्य नाही हे वास्तव कितीही न आवडणारे असले तरी सत्य आहे. 'मान्सून उशीरा का होईना पण आला', यातून मिळणाऱ्या दिलाशातून, ही भयंकर गोष्ट आपणच घडवत आहोत हे लक्षात येत नाही. वातानुकूलन (ए.सी) यंत्र बसवणे किंवा झाडे लावणे हे लहान पातळीवर आणि सौर, पवन किंवा अणुऊर्जा हे मोठ्या पातळीवरील उपाय आहेत, हा गैरसमज आहे. पृथ्वीचा एसी म्हणजे ध्रुवांवरील, पर्वतांवरील बर्फ, आपण बिघडवला आहे. आपण पाच-दहा मिनिटे राहू शकत नाहीत पण सर्व प्राणिमात्र व वनस्पती उन्हात आहेत. शेतकरी, कष्टकरी तापत आहेत. तीच गोष्ट मासळीची. सागर तर भूमीपेक्षा तीन-चार पटीने जास्त वेगाने तापत आहेत. मासळी नष्ट होत आहे. पैसे छापता येतात परंतु फळे, पिके व मांस मासळी छापता येत नाहीत.

वरील कोणतेही उपाय केले तरी कार्बन उत्सर्जन शून्य होणे आणि सागर व भूमीवरील हरितद्रव्याचा नाश थांबणे शक्य नाही. त्यासाठी औद्योगिकीकरण थांबवणे हा एकमेव मार्ग आहे. भौतिक विकास की अस्तित्व? हा प्रश्न आहे. या स्थितीत वाहने, वीज वापर, सिमेंटच्या बांधकामांना विकास म्हणणे हीच चूक झाली आहे. या तीन गोष्टींमुळे दरवर्षी होत असलेल्या ४००० कोटी टनापेक्षा जास्त कार्बन डायऑक्साईड वायूच्या उत्सर्जनापैकी सुमारे ९५% उत्सर्जन होत आहे. मात्र २०१७ चा अहवाल तापमानवाढ अपरिवर्तनीय झाल्याचे सांगतो. याचा अर्थ कार्बनची वाढ शून्य व्हावी. मूळ विकास असा मानवजातीच्या मूळावर आला असताना मुंबईत ५० ते १०० मजली टॉवर्सचा पुनर्विकास करणे, हा आत्मघात आहे. मुंबई, न्यूयॉर्क, लंडन, पॅरिस, शांघायसह जगातील सर्व शहरीकरण विसर्जित करण्याची ही वेळ आहे. २५० वर्षांपूर्वीपर्यंत जीवनाने रसरसलेल्या सुंदर पृथ्वीला औद्योगिक विकासाने उध्वस्त केले. या पूर्ण ग्रहाला ना-विकास क्षेत्र मानले पाहिजे.

**महाराष्ट्राला 'अग्रेसर औद्योगिक राज्य' ही प्रतिमा जपणे फार आवडते. देशात सर्वाधिक धरणे महाराष्ट्रात झाली आणि सर्वात मोठी पाणी समस्या महाराष्ट्रात दिसते. महाराष्ट्रात आज या विकासाचे निर्णय विदर्भातून व नागपूरमधून होतात. पण तापमानवाढीमुळे देशात प्रथम निर्मनुष्य होणारा भाग समुद्रापासून सर्वात दूर असलेला विदर्भ आणि नागपूर असणार आहे. त्याचवेळी मुंबईसह सर्व किनारपट्ट्या बुडू लागतील.**

फक्त अडीचशे वर्षांत पृथ्वीच्या जैविक पर्यावरणीय व्यवस्थेवर कृत्रिम औद्योगिक-आर्थिक व्यवस्थेचे आरोपण केले आहे. या व्यवस्थेत यंत्र, पैसा लागतो म्हणून तो महत्त्वाचा आणि आवश्यक आहे, तो जगवतो, हा निष्कर्ष अयोग्य आहे. ज्यात यंत्र व पैसा लागतो, ती पृथ्वीच्या व जीवनाच्या विरोधात जाणारी औद्योगिक व्यवस्था चुकीची आहे, हा योग्य निष्कर्ष ठरतो. नासाचे माजी संचालक डॉ. जेम्स हॅनसेन यांनी, त्यांच्या सन २००९ मध्ये आणलेल्या 'स्टॉर्म्स ऑफ माय ग्रँडचिल्ड्रन' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे २०१० ते २०२० ही तापमानवाढीपासून मानवजात वाचवण्याची शेवटची संधी होती.

डॉ. हॅनसेन या ग्रंथात स्पष्ट करतात की सन १९८० मध्ये पृथ्वीवरील ऋतुचक्र मोडले ही गोष्ट नासाने नोंदली, पण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष खनिज इंधन कंपन्यांचे मालक वा भागीदार असल्याने हे संशोधन जगापुढे मांडू दिले नाही. ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. जनतेला वाटते की मानवजातीसाठी बलिदान देण्याची विज्ञानाची परंपरा असल्याने आपणास सत्य सांगितले जात राहील. परंतु अणुबॉम्ब निर्मितीपासून विज्ञानावर राजकीय आर्थिक शक्तींनी ताबा मिळविला आहे, त्यात गुप्ततेचा प्रवेश झाला आहे. विज्ञान जरी निखळ सत्य सांगत असले तरी ते मानवजातीपर्यंत पोहचू द्यायचे की नाही, हे औद्योगिकीकरणाचे, अर्थव्यवस्थेचे सूत्रधार ठरवत आहेत. प्रसारमाध्यमे आणि शिक्षण त्यांच्या हातात आहे. उच्चाटनात हे सूत्रधार देखील वाचणार नाहीत.

पण एक मोटार जवळ असलेल्यांना जर मोटारीचा मोह सोडवत नाही, 'मोटार' हे पृथ्वीवरील अरिष्ट आहे, हे जर्मनीतील हायडेलबर्ग विद्यापीठाने अभ्यासाद्वारे सांगितलेले सत्य टाळण्यासाठी ते युक्तिवाद करत राहतात, तर जे मोटार उद्योगाचे, खनिज इंधनाचे, सिमेंट कंपन्यांचे, बँका व इतर जागतिक वित्तीय संस्थांचे मालक आहेत, त्यांची आसक्ती, मोह किती जबरदस्त असणार. शेकडो कोटी मानव हे त्यांचे ग्राहक आहेत, नफ्याचे निमित्त, या रूपात आहेत, त्यामुळे, सर्वनाश समोर उभा ठाकला असूनही या सूत्रधारांना त्यांच्या आर्थिक साम्राज्याचा मोह सुटत नाही. जगातील सत्ताधारी, सरकारे, संपादक इ. त्यांच्या तालावर नाचणाऱ्या कठपुतळ्या आहेत. पृथ्वीवर ताबा मिळवला या कैफात, सत्य लपवून ते मानवजाती बरोबर स्वतःचा देखील नाश करत आहेत.

आत्ता पृथ्वीवरील मोटारी, वीज, सिमेंट वापर आणि अर्थातच त्यांची निर्मिती थांबवली गेली तरच वाचण्याची शक्यता तयार होईल. सर्व स्वयंचलित भौतिक साधनांवर आधारित औद्योगिक जीवनशैली बदलून पुन्हा ग्रामीण शेतीप्रधान पद्धतीकडे तात्काळ वळावे लागेल. पर्यायी ऊर्जांच्या वापराच्या, कमी कार्बन निर्माण करणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या चर्चा तात्काळ थांबवाव्या. हे अतिरेकी विचार नाहीत. यंत्रांचा, ऊर्जेचा वापर हा अतिरेक होता. ते पृथ्वी या जीवन देणाऱ्या एकमेव ग्रहाच्या विरोधात केलेले कृतघ्न वर्तन होते, अक्षम्य गुन्हा होता. पृथ्वीवर जीवनापेक्षा महत्त्वाचे व रक्षण करण्यासारखे काही नाही. सुमारे ४११ कोटी वर्षांत झालेला जीवनाचा विकास हा पृथ्वीवरील मुख्य प्रवाह आहे, बुडबुड्यइतक्या काळात आलेले औद्योगिकीकरण नाही. पृथ्वी जीवन देण्यासाठी आहे, नोकरी देण्यासाठी नाही.

**५ वर्षांत १०°से ची महाविस्फोटक तापमानवाढ व या गतीने फक्त पुढील २० ते ३० वर्षांत होणारी ४° ते ६° से ची सरासरी वाढ, या पार्श्वभूमीवर कोणतेही विकास प्रकल्प आता भारतच नव्हे; तर, कुठेही होणे ही मानवजातीची आत्महत्या ठरेल. प्रत्येक माणसाने ऊर्जाविरहित जीवनपद्धती तातडीने स्वीकारण्याची गरज आहे. तापमानवाढ अपरिवर्तनीय झाली असल्याने प्रत्येक मोटार थांबणे व प्रत्येक झाड वाचणे आवश्यक आहे. अशावेळी मुंबईत सागरी रस्ता, मँग्रोव्ह तोडणे, वाढवण मेगापोर्ट, कोकणचे अणुऊर्जा व इतर प्रस्तावित प्रकल्प, निकोबारचा विकास, अरावली व इतर डोंगर तोडणे, छत्तीसगडचे हसदेव जंगल कोळसा खाणीसाठी उखडणे, ओडिशातील साझिमलीतील जंगलाचा बॉक्साइटच्या खाणीसाठी नाश, मध्य प्रदेशातील केन व बेतवा नदी जोडणी, गुजरातमधील नर्मदेसह इतर नद्या अडवणारा कल्पसार प्रकल्प, यासह सर्व औद्योगिकीकरण व शहरीकरण प्रकल्प रद्द व्हावे. मला जाणीव आहे की अनेकांना हे सांगणे विचित्र वाटेल, परंतु सत्य हे आहे की, पृथ्वीवर कृत्रिम जीवन उभे करणे ही विचित्र गोष्ट होती.**

तेल आणि वायूच्या मालकीवरून आखाती युद्ध चालू आहे. तेल, वायू आणि कोळसा, जाळायचा नाही, अणुभंजन देखील करायचे नाही, अशी स्थिती पृथ्वीवर आहे याचे कोणतेही भान देशांना नाही. आर्थिक विकासाचे वेड आहे. देशात नीट आणि इतर परीक्षांतील... पृष्ठ क्र. ६ वर

# ‘रावणी’ अहंकार-अत्याचाराचं, चंद्रभागेच्या पाण्यात विसर्जन करण्यासाठी...अयोध्येतला ‘राम’, आषाढी-एकादशीला पंढरपुरात अवतरला अन् तोचि अवघा चमत्कार जाहला...!!!

‘CJP’च्या Gen-Z झुरळांच्या जंतरमंतरवरील आंदोलनाने, नेमका तोच चमत्कार घडवलाय; जो कधिकाळी म. गांधींनी शतकभरापूर्वी ‘एक हाती’ घडवला होता...तो चमत्कार म्हणजे, ‘‘क्रूर-नृशंस सत्ताधाऱ्यांबाबतची जनमानसातली भिती, पूर्णतया नष्ट करणं!’’

**...तेव्हा, आजच्या क्रूरकर्मा सत्ताधाऱ्यांचे डरपोक पूर्वज-वंशज, ब्रिटीशांसमोर शेपूट घालून बसले होते आणि त्या महात्म्याच्या स्वातंत्र्यलढ्याला अपशकून करत, ब्रिटीशांची थुंकी चाटण्यात ‘जीवनगौरव’ मानत होते!**

सोनम वांगचूक यांनी या ‘CJP’च्या लढ्याला जे २३ दिवसांचं कठोर उपोषण करुन, त्यास ‘नैतिक-अधिष्ठान’ दिलं; त्याबद्दल संपूर्ण भारत जरुर त्यांचा ऋणी राहील. पण इतःपर सोनम वांगचूक यांनी अशा उपोषण वा अन्य स्वरुपाच्या आंदोलनाच्या फंदात कृपा करुन पडू नये...त्यांची बायको, दिल्लीतील एका रंगबदलू ‘सॉफ्ट-हिंदुत्ववादी’ राजकारण्याच्या नादाने व ‘कंगना राणावत’ ढंगाने, राहुल गांधींविषयी वेडवाकडं बोलली असली; तरी, त्याची राजकीय किंमत शून्यच (तिची राजकीय-विचारसरणी व एकूणच कारकीर्द वादग्रस्त असली; तरी, त्याबाबत बोलण्याएवढी ती अजिबात मोठी नव्हे)! स्वतः सोनमजी, हे ‘आचरणशील बौद्ध’ व सरळसाध्या स्वभावाचे (‘राळेगणसिद्धी-पॅटर्न’चे नव्हेच) असल्याने, त्यांचं कमजोर




व भरकटलेलं ‘राजकीय-आकलन’, वेळोवेळी त्यांचा अवसानघात करत आलंय...भाजप-संघीय लोकं, अशा साध्याभोळ्या ‘कमिटेड्’ लोकांना, ‘गिऱ्हाईक’ बनवण्याएवढे पक्के मुरलेले ‘शातिर’ असतातच, म्हणूनच त्यांना हा प्रेमाचा सल्ला! त्यांनी एक निरुपद्रवी ‘NGO’ म्हणून, पूर्वीसारखंच जीव ओतून जनहिताची कामं व संशोधनं जरुर करत रहावीत; कारण, त्यांचा परोपकारी पिंड त्यांना स्वस्थ बसू देणार नाहीच.

अभिजीत दिपके, सौरभ दास, नेहा बोरा आणि उर्वरित सगळ्याच ‘Gen-Z’ चमूचं; तसंच, त्यांच्या आवाहनाला, सगळा धोका पत्करुन कडवी साथ देणाऱ्या भारतीय नवतरुणांचं मनःपूर्वक अभिनंदन व त्यांना लाख लाख धन्यवाद!

**मागील दोन पिढ्यांची ‘नाकामी’, तुम्ही तुमच्या हिंमतीने, हिकमतीने व निर्धाराने अक्षरशः धुवून टाकलीत... त्याबद्दल, तुमचे आभार, हे मानावेच लागतील. महाराष्ट्रापुरतं बोलायचं (कारण, ‘अभिजीत’ शिवछत्रपतींच्या शूर-लढवय्या मातीला जागला, म्हणूनच खास); तर, आमच्या आधीच्या पिढीच्या राजकारण्यांनी, निहीत राजकीय व आर्थिक स्वार्थापोटी, ‘‘चूड दाखवून भाजप-संघीय वाघाला घरात (महाराष्ट्रात) आवतण दिलं’’ आणि देशाचा मोठा घात केला! आमच्या पिढीतल्या राजकारण्यांविषयी तर, काय बोलावं?** या भयंकर घातकी सत्ताधाऱ्यांच्या (व्यवहारतः ‘देशद्रोही’ असताना, स्वतःला देशप्रेमी भासवणारे) ‘दमन-यंत्रणां’नी उभ्या केलेल्या आव्हानासमोर...आजवर कमावलेली ‘सत्ता आणि पैसा’ राखताना, त्यांची एकच तारांबळ आणि घाबरगुंडी उडाली. प्रत्यक्ष, ईडी/सीबीआय/आयटीच्या धाडी पडायच्या आतच, निव्वळ आलेल्या नोटिशींनी त्यांची चड्डी साफ ‘पिवळी’ झाली आणि तिचं धुतलेली ‘अर्धी चड्डी’ घालून, ते भाजप-संघीयांचे अतिशय लाचार-लाजिरवाणे ‘मांडलिक’ बनले... त्यातल्याच, काही मांडलिकांचं ‘मांडलिकत्व’ दडवून, त्यांना या पाताळयंत्री **...पृष्ठ क्र. ७**

## हजारो वर्षांचा मान्सून बदलतोय; एल निनो नव्हे, मानवनिर्मित तापमानवाढ आहे खरी चिंता! ...पृष्ठ क्र. ५ वरुन

पेपरफुटीवरून आंदोलन होत आहे. युवा प्रक्षुब्ध आहे. नैराश्यातून काही परीक्षार्थींनी आत्महत्या केली. या करोडो तरूणांना दर्जेदार आयुष्य जगण्यासाठी नोकरी हवी आहे. पण ही जीवनाच्या दर्जाची कल्पना प्रत्यक्षात जीवनाविरुद्ध काम करते याची त्यांना वा समाजाला जाणीव नाही. माणसे, प्राणिमात्र, पिके ही पृथ्वीच्या नैसर्गिक जैविक व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहेत. परंतु विकास म्हटल्या जाणाऱ्या वाहने, वस्तू, वीज-ऊर्जा, सिमेंट इ.च्या बाबत तसे नाही. ही कृत्रिम व्यवस्था पृथ्वीवर परकी आहे. यामुळे प्राणवायू-वातावरण, अन्न, पाणी, तापमान यांची जैविक जाळ्याशी जोडलेली नैसर्गिक व्यवस्था उध्वस्त झाली आहे.

**हजारो कोटी मोटारी व इतर वाहने, हजारो कोटी वस्तू व उपकरणे, सिमेंटचे रस्ते, विमानतळ, बंदर, रेल्वे इ. निर्माण करणे हे घोर अज्ञानामुळे घडले. सन १७५६ पासून व विशेषतः गेल्या शंभर वर्षांत पृथ्वीवरील जवळजवळ ८०% जीवन या मानवी कृत्रिम विकासात नष्ट झाले आहे, ही गोष्ट अज्ञान सिद्ध करण्यास पुरेशी आहे. अजून कसली वाट पहायची? सर्वनाश होण्याची?**

आजही बहुतांश मानवजातीला पृथ्वीचे तापमान ५ वर्षांत १०° से या विलक्षण गतीने वाढत आहे, याची सुतराम कल्पना नाही. त्याचा अर्थ समजत नाही. यात शिक्षितांचाही समावेश होतो. या लेखातील सर्व माहिती वैज्ञानिक पुराव्यावर आधारित आहे.

मानवजात व जीवसृष्टीच्या रक्षणासाठी केवळ प्रकल्पांविरुद्ध आंदोलन करणारांनी नाही तर सर्व जनतेने प्रकल्प रद्द व्हावे अशी मागणी करावी कारण आता उच्चाटनाच्या धोक्यामुळे सर्व मानवजात बाधित ठरते. प्रकल्पांमुळे निर्माण होणारी कार्बन डायऑक्साईड, मिथेन, नायट्रोजन ऑक्साईड व इतर वायू-द्रव्ये तापमान वाढ घडवतात. तापमानवाढीमुळे हवामान बदलाच्या उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी, बर्फवृष्टी, महापूर, वादळे, वणवे, सागराचे आक्रमण, भूजल खाली जाणे, वाळवंटीकरण, अन्नोत्पादनात घट इ. अनेक दुर्घटना घडतात.

**स्वयंचलित यंत्राच्या शोधामुळे हरखून गेलेल्या, वेड्या बनलेल्या तथाकथित आधुनिक मानवजातीला जाणवत नाही की जीवसृष्टीतील मानवासह सर्व शरीरे स्वयंचलितच आहेत आणि मानवाने निर्माण केलेल्या यंत्रांपेक्षा उच्च दर्जाची व अप्रतिम आहेत, त्यांना भावना आहेत आणि ती मानवनिर्मित यंत्रांप्रमाणे उष्णता, प्रदूषण, विनाश करत नाहीत. सजीव लाखोंच्या संख्येने पुनरूत्पादन देखील करू शकतात. एका मासळीने लाखो पिलांना जन्म देणे, मानवाचा वा इतर प्राणिमात्रांचा जन्म, एका बीजामधून प्रचंड वृक्ष निर्माण होणे हे स्वयंचलितच आहे.**

असे दिसते की, औद्योगिक विकासामुळे ५ वर्षांत १०° सेच्या तापमानात होत असलेल्या संहारक वाढीमुळे काही वर्षांत मानवजात व जीवसृष्टी नष्ट होणार आहे, ही गोष्ट समजली तर औद्योगिकीकरण थांबवावे लागेल आणि तसे होऊ नये म्हणून मान्सून हा अविष्कार बंद झाला, ही गोष्ट कळू दिली जात नाही. यापूर्वी सन १९६० पासून उत्तर ध्रुवावर बर्फ अधिकचे वितळू लागले, १९८० मध्ये ऋतुचक्र मोडले या गोष्टी देखील लपवल्या गेल्या. त्यामुळे विनाश जवळजवळ अटळ बनला. यात सत्य लपवण्याचा प्रयत्न करणारे देखील नष्ट होणार आहेत. चरखा व हातमागाने मँचेस्टरच्या स्वयंचलित यंत्रांना यशस्वीरित्या तोंड दिले ही गोष्ट दाखवते की स्वराज्य या संकल्पनेतून देश शाश्वत अस्तित्व टिकवू शकतो. पण औद्योगिकीकरण, शहरीकरण व जीडीपी वाढीवर आधारित अर्थव्यवस्थेत शाश्वतता नाही.

औद्योगिकीकरणासाठी असलेल्या शिक्षणाने मेंदूतील विचारांची घडण केल्याने शिक्षित माणूस आपोआपच प्रस्थापित आर्थिक व्यवस्थेचे समर्थन करत राहतो. तो यंत्रांची, वीज, सिमेंट, वस्तू, उपकरणांची बाजू घेतो आणि स्वतःच्या अस्तित्वाविरूद्ध उभा राहतो. प्रकल्प राबवणारे सरकार, उद्योगपती, बँकर, नोकरशहा, व्यापारी, अभियंते म्हणजे माणसेच आहेत. मानवी व्यवस्थेत सत्तेने वा पैशाने कितीही शक्तिशाली असले तरी हाडामासाचे सजीव आहेत. तापमान सर्वांना स्वाहा करणार आहे. पृथ्वीचे शोषण केल्याने प्रथमच शोषक व शोषित दोन्ही बळी जाणार आहेत. पृथ्वीने कुणाचेही शोषण केले नव्हते. सर्व जीवनाला विकासाची संधी दिली होती.

**हजारो वर्षे संयम, साधेपणा व शहाणपणाने पृथ्वी व निसर्गाशी सुसंगत शेती, चरखा-हातमागावरील वस्त्र आणि माती-बांबू-कुडाच्या घरात भारतीय राहिले. सत्याला सामोरे जाऊन ताबडतोब परत तसे राहणे आणि ऊर्जाविरहित, शोषण व विषमतामुक्त शाश्वत जीवन जगणे, हेच आपल्याला वाचवू शकेल.**

आपला नम्र,

***...ॲड. गिरीश राऊत***

निमंत्रक : भारतीय, जीवन आणि पृथ्वीरक्षण चळवळ

# प्रत्येक न्यायाधीश रंजन गोगोई किंवा चंद्रचूड नसतो

काही न्यायाधीश लोया यांच्यासारखे प्रामाणिकही असतात. जीवावर उदार होऊन ते न्यायाधीश न्यायाची चाड राखतात.

पहिल्या फोटोत दिसणारे न्यायाधीश निकोलस जी. गॅराफिस आहेत, ज्यांनी अमेरिकेत अदानींचे जग पुन्हा गदागदा हलवले आहे.

अमेरिकेच्या न्याय विभागाने गौतम अदानींवरील सर्व आरोप फेटाळणारा आदेश न्यायाधीश निकोलस जी. गॅराफिस यांनी रद्द केला आहे. शिवाय १३ जुलैपर्यंत DOJ (Department of Justice)च्या या तडकाफडकी निर्णयाचा सविस्तर अहवालही त्यांच्याकडून मागवला आहे.

अदानींचा खटला कोणाच्या दबावाखाली कमकुवत करण्यात आला आहे, हे त्यांना सविस्तर जाणून घ्यायचे आहे, असे न्यायमूर्ती निकोलस यांनी स्पष्ट केले.

सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कमिशनच्या (SEC) नागरी खटल्यात कोणतीही चूक न कबूल करता, अडानीने सुमारे २८०० कोटींहून (१८ दशलक्ष डॉलर्स) अधिक रक्कम देऊन समझोता केला. इराणवरील निर्बंधांच्या कथित उल्लंघनासाठी अडानी एंटरप्रायझेसने अमेरिकेत स्वतंत्रपणे २७५ दशलक्ष डॉलर्सचा दंड भरण्यास सहमती दर्शवली.

खटला मिटवण्यासाठी अडानी समूहाने अमेरिकेत १० अब्ज डॉलर्स (सुमारे ८३,००० कोटी रुपये) गुंतवणुकीची आणि त्याद्वारे १५,००० नवीन नोकऱ्या निर्माण करण्याची योजना सादर केली होती, ज्याला ट्रम्प प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला..

जज निकोलस यांना हे सर्व संशयास्पद वाटले असावे.

ते भारतात असते तर, आतापर्यंत कदाचित त्यांच्या मॉर्निंग वॉकची वेळ शोधून काढली गेली असती.

किंवा ते नसतं जमलं तर त्यांना राज्यसभेच्या खासदारकीचं आमिष दाखवलं असतं.

पण अमेरिकेत न्यायाधीशापुढे खुद्द ट्रम्प यांचेही चालत नाही; तर, इतरांची काय कथा ? एका प्रामाणिक न्यायाधीशाला तिथे कुबेर आला तरी विकत घेतलं जाऊ शकत नाही.

ट्रम्प यांच्यावर कोट्यवधी रुपये उधळूनही, त्यांना तोंडभरून ''हिज एक्सलंसी'' ''हिज एक्सलंसी'' करुनही आणि अमेरिकेशी करण्यात आलेल्या गैरवाजवी व्यापार करारांबद्दल संपूर्ण भारतात टीका झेलूनही, पंतप्रधान आपल्या मित्राला वाचवू शकत नाहीयेत असे दिसते आहे.

मोदींचा लवकरच अमेरिकेला दौरा होईल, बघालच तुम्ही.

कारण जादूगाराचा जीव पोपटात आहे. पोपट कोण जादूगार कोण हे सुज्ञ वाचकांना सांगावे लागू नये.

***– दिनेश डांगी***

राजस्थानचे ज्येष्ठ पत्रकार

---

## ...अयोध्येतला 'राम', आषाढी-एकादशीला पंढरपुरात अवतरला अन् तोचि अवघा चमत्कार जाहला...!!! ...पृष्ठ क्र. ६ वरुन

**वर** भाजपवाल्यांनी 'विरोधकांची 'स्पेस' भरुन काढण्यापुरतं महाराष्ट्रात मोकळं सोडलं. ''जे पिंडी, ते ब्रह्मांडी'' या न्यायाने, जे नापाक राजकारण महाराष्ट्रात फसफसलं, तेच पुढे भारतभर, अधिक तीव्रतेनं प्रतिबिंबित व्हायला लागलं.

...अशा परिस्थितीत, श्रीलंका, बांगलादेश वगैरेमध्ये घडलं; त्याच पद्धतीने, या भारतीय 'Gen-Z'लाच उचल खाणं भाग होतं! ...आणि घडलंही बव्हंशी तसंच. स्वतःचं 'शर्मा' आडनाव लपवून ठेवणाऱ्या न्यायाधीशांनी एका बेसावध क्षणी, त्यांना 'झुरळं व परजिवी' संबोधून संतप्त तरुणाईच्या अंतःकरणातल्या ज्वालामुखीला उद्रेकाची संधि मिळवून दिली आणि ''What if, all cockroaches come together?'' म्हणत; ''हजारो-लाखो झुरळं, जंतरमंतरची वाट चालू लागली; ती, तब्बल एका तपाची अंतहीन वाटावी...अशी अवघं भारतीय अवकाश व्यापून असलेली (Omnipresent), आधुनिक 'नॉन बायॉलॉजिकल सम्राटां'ची हुकूमी-दहशत, 'छू मंतर' करण्यासाठी!

...आणि, ज्यादिवशी (शनिवार, २५ जुलै-२०२६), महाराष्ट्रात चातुर्मासाच्या प्रारंभ करणारी 'आषाढी-एकादशी' होती...त्याचदिवशी, अयोध्येच्या लुटालुटीमुळे संतप्त व संत्रस्त झालेला 'राम', जणू तिथल्या राममंदिराचा त्याग करुन महाराष्ट्राच्या पंढरपुरात अवतरला; तो ती दहशत, ती हुकूमत...दक्षिण काशीमधल्या चंद्रभागेच्या पाण्यात बुडवून टाकण्यासाठी!

गणवेष म्हणजे, एकाच समूहातील व्यक्तिंना ओळखण्यासाठी असतो...त्यामुळे समूहात एकोपा, समानता आणि अनुशासन येतं...पण, तो विशिष्ट गणवेष वा कुठल्याही शासकीय-पदाचा अधिकार हा, दुसऱ्या कुठल्या समुदायाशी परस्पर अनुचित व्यवहार करण्यास अनुमती कधिच देत नसतो! पण, दिल्ली व अन्य ठिकाणच्या भाजप-सरकारकृत न्याय-सुव्यवस्था राखणाऱ्या व तपास करणाऱ्या यंत्रणा, गेली दहाबारा वर्षे सातत्याने व प्रामुख्याने 'दमन-यंत्रणा' म्हणून बेलगाम वापरल्या गेल्यात (त्यासाठी, जाणिवपूर्वक वेळोवेळी त्यांचे स्थानिक-प्रमुख बदललेत किंवा आधीच्यांना अनुचित-मुदतवाढ दिली गेलीय); केवळ, कोणी 'तोंडी वा लेखी माफी' मागितली म्हणून, अशा त्याज्य-निर्घृण घटनाक्रमातून, शिक्षेविना संबधित कुणाचीच सुटका होऊ नये. **खाकी गणवेषधारी गुंडांनी व साध्या कपड्यातील भाजपाई गुंडांनी खिळे ठोकलेल्या लाठ्यांनी आंदोलकांना अमानुष मारहाण केली, 'पॅलेट गन'च्या तुकड्यांनी कुणाचे डोळे गेले, तरुणींचे विनयभंग करत मारहाण करण्यात आली, आंदोलकांना अन्नपुरवठा करणाऱ्यांवर नाहक गुन्हे दाखल करुन अत्याचार केले...त्यासाठी, न्यायालयातर्फे SIT स्थापून अशांना कडक शिक्षा व्हायलाच हव्यात; नुसत्या माफीवर किंवा राजीनाम्यावर (शिक्षेआधी, राजीनामा मात्र हवाच) भागता कामा नये; कारण, हे ध्यानात घेतलं पाहीजे की, ''जले हुए घर को कैसे समझाएँ कि, आग ने माफी माँग ली है!''**

...तेव्हा, कुणाच्याही निव्वळ माफीने नव्हे; तर, पडद्याआडच्या नृशंस सूत्रधारांच्या 'प्रथमदर्शनी' राजीनाम्यानेच, या जंतरमंतरवरील 'CJP' आंदोलनाची इतिश्री व्हावी... त्यादृष्टीनेच, राहुल गांधींनी, गुंड-प्रवृत्तीच्या दिल्ली-पोलिसांचं सूत्रसंचालन करणाऱ्या गृहमंत्र्यांना थेट उद्देशून लिहीलेलं पत्र, अतिशय महत्त्वपूर्ण आहे...कारण, दुसऱ्या महायुद्धोत्तर न्यूरेंबर्ग आंतरराष्ट्रीय न्यायाधिकरणाने ''Unwarranted initiatiation of aggression... is not only an international crime; but it contains within itself, the accumulated evil of the whole'', हे सूत्र जगन्मान्य केलेलं आहे! तसेच, त्यातीलच ''Personal responsibility cannot be avoided by claiming obedience to 'superior orders', when a 'moral-choice' was possible'' या सूत्रानुसार, ज्याप्रमाणे CRPF ने प्राणपणाने सत्ताधाऱ्यांच्या संरक्षणाची हमी दिल्याचं; मात्र, जंतरमंतरवरील शिस्तबद्ध व अहिंसक तरुणाईवर निर्घृण लाठीहल्ला वा गोळीबार करायला नकार दिल्याचं समजतं; तिचं न्यायसुसंगत व घटनात्मक भूमिका, दिल्ली-पोलिसांकडून घेण्यात आली नाही...म्हणूनच, संबंधित सर्वांनाच सखोल न्यायालयीन-चौकशीतून कडक शासन व्हायला हवं; जेणेकरुन, भविष्यात प्रत्येक लाठीधारी-बंदुकधारी शिपाई वा जवान, शांततामय आंदोलनाचा 'घटनात्मक हक्क' बजावणाऱ्या, आपल्याच देशातील नागरिकांविरुद्ध अवाजवी व बेकायदा बळाचा वापर करायला धजावणार नाही!

...आजच्या विमनस्क करणाऱ्या स्थितीत, हे ध्यानात घेतलं पाहीजे की, हे तथाकथित 'हिंदुत्ववादी' लोक, त्यांनी चालवलेल्या आदिवासी-आश्रमांतून (ज्याला, ते आदिवासींचा जंगलावरचा हक्क डावलण्यासाठी म्हणून मुद्दाम 'वनवासी-आश्रम' म्हणतात) ''विवेकाविना विकास, हे सप्त महापातकांपैकी एक आहे'', असं प्रतिपादन नेहमी करत असतात...त्याच न्यायाने, **''मूठभर भांडवलदारांची 'ओटी'...नको तेवढी ओसंडून भरणारा, आमच्यावर हुकूमत गाजवणारा, माणुसकी-भूतदयेचा 'विवेक' सोडलेला...तुमचा 'विकास', आम्हाला नकोय...तुमची गलिच्छ राजकारणं, तुमची युद्धे आम्हाला नकोत; आम्हाला शांति-सुखासमाधानाने आणि आमच्या स्वतःच्या मताने 'मूलभूत हक्क' म्हणून नैसर्गिक आनंदाने जगण्याचा 'अवकाश' द्या'' हे, ही नवी 'Gen-Z' जगभर आक्रंदून सांगतेय!**

**जाता जाता, आम्ही 'धर्मराज्य पक्षा'तर्फे...'EVM'चा निषेध करण्यासाठी व 'पूर्ववत 'मतपत्रिकेवर** (Ballot Paper) **निवडणुका होण्यासाठी...२६ जानेवारी-२०२५च्या 'अमृतमहोत्सवी प्रजासत्ताक दिनी' रात्रौ ९.०० वा. ५ मिनिटे सगळे लाईट्स बंद करण्याचं, सर्व पक्षीय नेत्यांना प्रत्यक्ष भेटून वा अधिकृतरित्या कळवूनही, दुर्दैवाने कुणीही मनावर घेतलं नाही व एक अनमोल संधि वाया दवडली गेली...त्यांच्याकडून, परिणामकारकरित्या हे होत नसेल, होणार नसेल; तर, याच 'GEN-Z'ने नजिकच्या भविष्यात, ही जबाबदारी आपल्या खांद्यावर घ्यावी व धोक्यात आलेली देशातील 'लोकशाही' वाचवावी व भाजप-संघीय 'ठोकशाही'ला कायमचा पूर्णविराम देण्याचं महत्कार्य पार पाडावं, धन्यवाद...!!!''**

''NO BLLOT PPER...NO ELECTION''

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ... तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

इनमीन साठ दिवसातच झालेल्या मिसिंग लिंकच्या वाताहतीबद्दल लोकांनी प्रश्न विचारले; तर, 'महाराष्ट्राचा अपमान सहन करणार नाही', अशी आवई उठवणाऱ्या फडणविसांना थोडं फ्लॅशबॅकमध्ये घेवून जावूया. फार दीर्घकाळातील नाही, महाविकास आघाडीचं सरकार स्थापन झाल्यानंतरच्या फक्त सहाच महिन्यातल्या फडणविसांनीच केलेल्या गोष्टी त्यांनाच आठवून देवू या...



**सत्तेत समसमान वाटा पण अडीच वर्षाच्या मुख्यमंत्रीपदाबाबत बोलणं झालं नव्हतं, या एकमेव पालुपदाखाली फडणविसांनी जवळपास वीस दिवस महाराष्ट्रात जेव्हा सत्तेचा खो घालून ठेवला होता. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?**

वीस दिवसांची आदळआपट करूनही तत्कालीन शिवसेना तयार होईना म्हणून मग शेवटी अजित पवारांशी एका रात्रीत पाट लावला नी पहाटे पहाटेच शपथविधीही उरकून घेतला. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

उद्धव ठाकरेंच्या शपथविधीनंतर त्यांना न भेटता फडणवीस तडक निघून गेले आणि मग ट्विटरवरून सदिच्छा दिल्या. महाराष्ट्राच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्र्याला समोरासमोर भेटून सदिच्छा देण्याचीही दानत फडणविसांनी जेव्हा दाखवली नव्हती. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

कुठल्याही नव्या सरकारच्या अधिवेशन पूर्वसंध्येच्या चहापानावर बहिष्कार ही विरोधी पक्षाची जणू रीतच. पण उध्दव ठाकरेंच्या नव्या सरकारच्या मंत्रिमंडळ शपथविधी कार्यक्रमावरही विरोधी पक्ष नेता असलेल्या फडणविसांनी जेव्हा बहिष्कार घातला होता. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

**लोकशाहीचे कुठलेही संकेत न पाळता स्वत:च्या शपथविधीसाठी ज्या फडणविसांनी रातोरात राष्ट्रपती राजवट उठवली, राज्यपालांना झोपेतून उठवलं. त्याच फडणविसांनी प्रोटेम स्पीकरचं तांत्रिक कारण देत महाविकास आघाडीच्या पहिल्याच मंत्रिमंडळ विस्ताराच्या शपथविधीवर जेव्हा बहिष्कार घातला होता. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?**

ठाकरे आडनाव काय, रेशीम किडा काय, बांगड्या घाला म्हणणं काय, ॲक्सीस बँकेतील खाते बदलणं काय, ठाकरे स्मारकासाठी झाडे कापण्याची खोटी बातमी वापरणं काय. नव्या सरकारच्या प्रत्येक निर्णयावर मिसेस फडणवीसांनी आपली जाहीर नापसंती दर्शवली होती आणि त्याबद्दल कुठलाही खेद वा नापसंती मिस्टर फडणविसांनी जेव्हा व्यक्त केली नाही. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

**महाविकास आघाडीने सत्ता स्थापनेचा दावा केला तेव्हा प्रत्येक आमदाराचे पाठिंब्याचे स्वतंत्र पत्र हवे अशी अट राज्यपाल कोशारींनी घातली होती. मात्र, अजित दादांबरोबर सत्ता स्थापन करताना अशी कुठलीही अट वा फट राज्यपालांनी जेव्हा फडणविसांना त्यांच्या शपथविधीपूर्वी घातली नव्हती. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?**

महाविकास आघाडीच्या शपथविधी कार्यक्रमात मंत्र्यांनी घेतलेल्या शपथेवरही राज्यपाल कोशारींनी जेव्हा जाहीरपणे नापसंती व्यक्त केली होती. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

कोरोनानिमित्त उद्भवलेल्या पेचप्रसंगातून मार्ग काढण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या राज्यपाल नियुक्त सदस्यत्वावर मंत्रीमंडळाने दोनदा प्रस्ताव देवूनही राज्यपाल कोशारींनी कोणताही निर्णय घेतला नाही. त्याचंही नंतर फडणविसांनी जेव्हा समर्थन केलं. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

**त्यानंतर केंद्र सरकारने मध्यस्थी करून विधान परिषदेची निवडणूक करायचे ठरवले. का? कारण त्यामुळे भाजपचे चार आमदार वाढणार होते. कोरोना काळात देशात कुठेही निवडणुका होत नसताना विरोधी पक्ष नेता असणाऱ्या फडणविसांच्या महाराष्ट्रात फक्त निवडणूका जेव्हा जाहिर झाल्या होत्या. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?**

उध्दव ठाकरेंचे सरकार आल्यानंतरच्या दोनच महिन्यात फडणविसांनी राज्यपाल कोशारींकडे एवढ्यांदा भेटी घेतल्या होत्या की नोवितातही डोरेमॉनकडे इतक्यांदा गेली नसेल अशी समाजमाध्यमात जेव्हा त्यांची खिल्ली उडवली गेली. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

कोरोना काळात रितीरिवाजांचे, प्रथा परंपरेचे सारे संकेत जगभरात तात्पुरते बाजुला ठेवले गेले होते. तरीही वारीचं समर्थन करीत ही परंपरा कायम राहिली पाहिजे असं फडणविसांनी जेव्हा सांगितलं होतं. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

**एवढं सगळं करूनही कुठेच काही होईना म्हणून मग 'महाराष्ट्र बचाव' आंदोलन तेव्हा केलं होतं. कोरोना काळात राजकीय आंदोलन केल्याची पहिली नोंद फडणविसांच्या भाजपच्या नावावर जेव्हा झाली होती. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?**

राज्यावर जेव्हा कोरोनाचं सर्वाधिक संकट होतं, टाळेबंदीने राज्याच्या उत्पन्नाचे आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते, केंद्राकडे राज्याच्या हक्काचे सोळा हजार कोटी अडकलेले होते. हे सगळं दिसत असूनही डोळ्यावर पट्टी बांधून फडणविसांनी आणि त्यांच्या महाराष्ट्रातल्या भाजपवाल्यांनी मोदीजींच्या पीएम केअर फंडात जेव्हा करोडो रूपये जमा केले होते. तेव्हा महाराष्ट्राचा अपमान झाला नव्हता?

फक्त मिसिंग लिंकबद्दल तुम्हाला प्रश्न विचारल्यावरच महाराष्ट्राचा अपमान होतो का, मिस्टर फडणवीस?

*...आनंद भंडारे*




**मिडीया दिखाये या न दिखाये,**
**वो खोखला 'गोदी' है,**
**...आंदोलन अब भी जारी है,**
**"मंझिल खमन-ढोकला 'मोदी' है!"**

...राजन राजे

**मध्यरात्री ताना 'शाह'ची टाईमपास 'रिळे',**
**...आणि, पोलिसांच्या**
**लाठ्यांना बसवलेले 'खिळे'!**
**विसरलो नाही, विसरणार नाही,**
**राममंदिर लुटणारे जुलमी**
**'रावण' झुकले... झुरळांमुळे!**

...राजन राजे

# ''सोनम वांगचूक, लडाखचे आचरणशील 'बौद्ध' आहेत; मनुवादाच्या विरोधात थेट उभे राहिले आहेत; त्याचा 'त्यांना' मोठा राग आहे....''

धनदांडग्या जैन-गुज्जू-मारवाड्यांच्या आणि ढीगभर पोरं जन्माला घालण्याचा एकमेव 'उद्योग' करणाऱ्या उत्तरभारतीयांच्या, आक्रमणापासून महाराष्ट्राला वाचविण्यासाठी... **''काश्मीरचं ३७० कलम काढण्याऐवजी, काश्मीरप्रमाणेच महाराष्ट्रालाही ३७० कलम लावा''; अशी आम्ही 'धर्मराज्य पक्षा'तर्फे तारस्वरात मागणी करत असतानाच...जोपर्यंत, सोनम वांगचूक, आपल्या गैरसमजातून काश्मीरचं ३७० कलम काढण्याला पाठींबा देत होते आणि नरेंद्र मोदींचं कौतुक करत होते; तोपर्यंतच, भाजप-संघीय अंधभक्तांना, ते मोठे देशभक्त वाटत होते.**

निःपक्षपाती वृत्तीने राजकीय चिकित्सा करण्याची निर्भेळ क्षमता बाळगून असलेला व ज्याच्याविषयी प्रचंड आदर वाटावा, असा माझा एक सच्चा आंबेडकरी-विचारधारेचा बौद्ध मित्र 'शुद्धोदन आहेर', याबाबत माझ्याशी चर्चा करताना जे म्हणाला, ते फार महत्त्वाचं आहे... शुद्धोदन म्हणाला, ''होय, 'आचरणशील बौद्ध' सहसा समोरच्या व्यक्तिला पॉझिटिव्हली घेतात, समोरचा माझ्यासारखाच आहे; असे गृहीत धरतात आणि फसतात!''




...पण, ज्याक्षणी, भाजप-संघीय भांडवली-हुकूमशाही राजवटीरुपी 'पुतना मावशी'चं सत्यस्वरुप सोनम वांगचूक यांनी अचूक जाणलं व उपरती होऊन, ते त्या शोषक-नृशंस राजवटीचा प्रखर विरोध करु लागले...त्या क्षणापासून, ते देशद्रोही ठरु लागले. रेटून खोटं बोलणारे हे डँबिस लोक, सोनम वांगचूक चीन-पाकिस्तानचे हस्तक असल्याचा, 'अमित मालवीय-पॅटर्न'ने (देशातल्या लोकशाहीचा मारेकरी' असल्याने, वस्तुतः, स्वतः देशद्रोही असतानाही) हे लोक धडाक्यात अपप्रचार करायला लागले. यासंदर्भात, बोलताना शुद्धोदन पुढे म्हणाला की, **''सोनम वांगचूक यांनी अहिंसक सत्याग्रहाची ताकद दाखवून दिली आहे...ते लडाखचे 'बौद्ध' आहेत व मनुवादाच्या विरोधात थेट उभे राहिले आहेत; त्याचादेखील 'त्यांना' मोठा राग आहे!''**

''रा. स्व. संघाचे दत्तात्रय होसबळे, भारतात बॉम्बफेक घडवणाऱ्या, अतिरेकी पाठवणाऱ्या पाकिस्तानशी चर्चा करायचं म्हणतात; मग, भारतीय विद्यार्थ्यांशी, सोनम वांगचूकशी चर्चा करायला तयार नाही, याचा अर्थ काय?''...१९ जुलै-२०२६च्या शिवाजी पार्कमधील सभेत मा. उद्धवजी ठाकरे यांनी, केंद्र-सरकारवर ओढलेले हे आसूड, यासंदर्भात अतिशय मार्मिक ठरावेत, धन्यवाद!

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

---

## ''एक तडफदार, प्रामाणिक 'तुकाराम मुंढे' एवढं मोठं काम करतो आहे आणि बाकीचे आजचे व आजवरचे, बहुतांश IAS / IPS 'अकार्यक्षम गुंडे'...आजवर नेमकं काय करत होते आणि काय करताहेत?''

''तो आला, त्याने पाहिलं आणि तो जिंकण्याऐवजी आपण जनता म्हणून जिंकलो''... एवढा मात्र फरक, आपल्याला ''He came, he saw, he won'', या ज्युलियस सीझरने उच्चारलेल्या जगप्रसिद्ध (''Veni, vidi, vici'') लॅटिन उक्तित करावा लागेल. कारण, **तुकाराम मुंढेंसारखं 'सतीचं वाण' हाती घेऊन सरकारी नोकरी करताना, कुठकुठल्या अग्निदिव्यांना सामोरं जावं लागतं; त्यांचं तेच जाणो! सरकारी-नोकरीच्या कार्यकाळात अनंत यातना त्यांना भोगाव्या लागतात, लागल्यात...पण, अंततः परिणामस्वरुप, अशा अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील व त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सार्वजनिक जीवन स्वच्छ व पारदर्शक होतं. त्यांच्याकरवी, आम जनतेला मोठा दिलासा मिळत जातो व जनतेची 'रोजमर्रा की जिंदगी' सुसह्य व समाधानी होत जाते.**

एकीकडे, पूर्वीचे ज्यूलियस रिबेरो व हल्लीचे अशोक खेमका, महेश झगडे आणि अर्थातच तुकाराम मुंढे वगैरे प्रामाणिक व ताठ पाठकण्याचे सरकारी-अधिकारी अतिशय दुर्मीळ असताना...दुसरीकडे 'अ'विश्वास नांगरे पाटलांसारखे अप्रामाणिक व पिचक्या पाठकण्याचे अधिकारी उदंड असतात. उदंड असतात एवढंच नव्हे; तर, अशांचा सार्वजनिक जीवनात आपल्याला पदोपदी, अगदी उघडपणे सुळसुळाट झालेला दिसत असतो!

...म्हणूनच, भ्रष्ट राजकारण्यांच्या संपत्तीचा लोकायुक्त, लोकपाल द्वारे किंवा SIT स्थापन करुन (हल्लीच्या ''चौकीदार चोर व चंदा चोर'' काळात...ईडी, सीबीआय, सेबी, आयटी या संस्थांची विश्वासार्हता रसातळाला पोहोचली असल्याने) चौकशी करण्याअगोदर... अफाट संपत्तीची जमवाजमव करुन गब्बर (खरंतरं 'गब्बरसिंग') झालेल्या, आजी / माजी सरकारी अधिकाऱ्यांच्या संपत्तीची सखोल तपासणी करुन त्यांना, 'जन-लोकपाल कायद्या'तील तरतुदीनुसार... ''भ्रष्ट मार्गाने कमावलेली संपत्ती व ती कमावताना सरकारी-तिजोरीचं केलेल्या एकूण नुकसानीची; त्यांनी तहहयात कमावलेल्या संपत्तीतून, एकत्रित नुकसानभरपाई करुन घेऊनच'', मग त्यांना तुरुंगाच्या 'गजाआड' पाठवलं पाहिजे.

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*



# मुस्लिम स्त्रियांचा संघर्ष : धर्म, पितृसत्ता आणि आधुनिकतेच्या उंबरठ्यावर

**भारतीय समाजात स्त्रियांच्या हक्कांची चर्चा झाली की बहुधा आपण हिंदू समाजातील विधवाविवाह, सतीप्रथा, बालविवाह किंवा सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई यांच्या लढ्यांपर्यंत मर्यादित राहतो. पण भारतातील मुस्लिम स्त्रियांवर झालेल्या अन्यायाविरुद्धच्या चळवळींचा इतिहासही तितकाच जुना आणि सशक्त आहे. फक्त तो इतक्या प्रमाणात समाजाच्या नजरेस आणला गेला नाही. 'तलाक', 'बुरखा', 'हिजाब' यांच्यापुरतीच त्यांच्या लढ्याची ओळख सीमित ठेवणे हा त्यांच्या इतिहासाचा आणि त्यांच्या सामाजिक संघर्षाचा अपमान आहे. मुस्लिम स्त्रियासुद्धा इतर भारतीय स्त्रियांप्रमाणेच पितृसत्ता, कौटुंबिक हिंसा, गरिबी, निरक्षरता, आणि सामाजिक नियंत्रणाचा सामना करत आल्या आहेत. मात्र त्यांच्या बाबतीत धर्माधारित कायदे आणि धार्मिक पुरुषसत्तेची दुहेरी बंधने असल्यामुळे हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा झाला आहे.**

या संपूर्ण प्रवासाचा मागोवा घ्यायचा झाला तर पहिल्यांदा लक्षात घ्यावी लागेल ती हमीद दलवाई यांची स्त्रीसुधारणा चळवळ. हमीद दलवाई हे स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिले मुस्लीम सुधारक आणि धर्मनिरपेक्ष विचारवंत होते, ज्यांनी १९६६ साली 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' स्थापन केले. त्यांनी धर्म आणि समाज यांच्यातील फरक अधोरेखित करत म्हटले होते, **''धर्म हा वैयक्तिक श्रद्धेचा विषय आहे; पण समाज हा विचारांच्या प्रगतीवर उभा असतो.'' त्यांच्या मते इस्लाममध्ये स्त्रियांच्या समानतेला धार्मिक आडकाठी नाही, पण धर्माच्या नावाखाली पुरुषांनी केलेल्या अर्थलाघवामुळे स्त्रियांवर अन्याय होतो. दलवाईंनी तीन तलाक, बहुपत्नीत्व, बालविवाह, पर्दा प्रथा, आणि धार्मिक अंधश्रद्धांविरुद्ध ठाम भूमिका घेतली होती.**

१९६६ मध्ये हमीद दलवाईंनी पहिल्यांदाच मुस्लिम महिलांचा मोर्चा विधानसभेवर नेला. हा भारतीय इतिहासातील अभूतपूर्व प्रसंग होता. त्या काळात मुस्लिम समाजात धार्मिक नेतृत्त्व अत्यंत प्रभावशाली होते. परंतु दलवाईंच्या नेतृत्वाखाली महिलांनी 'तोंडी तीन तलाक' बंदीची मागणी केली. हा मोर्चा समाजात वादळासारखा पसरला. पुरुषसत्ताक वर्गाने त्यांना 'धर्मद्रोही' ठरवले, पण महिलांमध्ये जागृतीची ठिणगी पडली. **दलवाईंचे योगदान इतके क्रांतिकारक होते की पुढे जाऊन त्यांच्या विचारांवर आधारित अनेक संघटना आणि स्त्रीवादी चळवळी उभ्या राहिल्या. त्यांनी लिहिलेलं 'इंडियन मुस्लिम्स : द नीड फॉर अ सेक्युलर आउटलुक' हे पुस्तक आजही मुस्लिम समाजाच्या सामाजिक सुधारणांच्या विचारांना दिशा देतं.**

दलवाईंच्या कार्यानंतर १९७० आणि ८० च्या दशकात मुस्लिम समाजात सुधारणा चर्चेला वेग आला. शिक्षित मुस्लिम स्त्रिया आणि उदारमतवादी पुरुष यांचा एक गट समाजातील कायदे आणि इस्लामी परंपरा यांचा पुनर्विचार करू लागला. पण त्याच काळात भारतात धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण वाढत होते. १९८५ मधील 'शहाबानो प्रकरण' हे या संघर्षाचे केंद्रबिंदू ठरले. शहाबानो बेगम या मध्यप्रदेशातील ६२ वर्षांच्या महिला होत्या, ज्यांना त्यांच्या पतीने तोंडी तीन तलाक देऊन घराबाहेर काढले. त्यांनी सर्वोच्च न्यायालयात पोटागीसाठी अर्ज केला आणि न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की भारतीय दंड प्रक्रिया संहिता कलम १२५ अंतर्गत सर्व धर्मांच्या स्त्रियांना पोटगीचा अधिकार आहे.

हा निर्णय स्त्री न्यायाच्या दृष्टीने ऐतिहासिक होता, पण त्याने मुस्लिम धार्मिक नेत्यांना हादरा दिला. त्यांनी या निर्णयाला ''इस्लाममध्ये हस्तक्षेप'' असे म्हणत तीव्र विरोध केला. राजकीय दबावाखाली तत्कालीन राजीव गांधी सरकारने



'मुस्लिम महिला (विवाहविच्छेदावर संरक्षण) कायदा, १९८६' पारित केला आणि न्यायालयाचा निर्णय निष्प्रभ केला. हा प्रकार स्त्रीच्या अधिकारापेक्षा धर्माधारित मतांच्या रक्षणाला प्राधान्य दिल्याचा नमुना होता. शहाबानो न्याय मिळवूनही पराभूत झाली. पण या घटनेने एक चळवळ पेटवली – मुस्लिम स्त्रियांना स्वतःच्या हक्कासाठी लढण्याची प्रेरणा दिली.

**शहाबानोच्या लढ्याने अनेक प्रगत मुस्लिम महिलांना विचार करायला भाग पाडले. १९९० च्या दशकात मुस्लिम महिला मंच, मुस्लिम महिला परिषद, आणि 'अस्मिता' सारख्या संस्थांचा उदय झाला. या संघटनांनी केवळ 'तलाक' किंवा 'बुरखा' या प्रश्नांपुरता विचार न करता शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि संविधानिक हक्कांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी इस्लाममधील समानतेच्या तत्त्वांचा अभ्यास करून हे सिद्ध केले की धर्माच्या मूळ ग्रंथात स्त्रियांविरुद्ध अन्यायाचे समर्थन नाही; अन्याय हा पुरुषांनी तयार केलेल्या सामाजिक रचनेचा परिणाम आहे.**

त्यानंतर २००० च्या दशकात मुस्लिम स्त्रीवादाला नवा बौद्धिक आयाम मिळाला. 'भारतीय मुस्लीम महिला आंदोलन' (BMMA) या संस्थेने या काळात भरीव कामगिरी केली. झाकिया सोमन, नूरजहाँ सफिया नियाझ, नाजनीन नायक, सईदा हमीद अशा स्त्रीकार्यकर्त्यांनी या चळवळीला आकार दिला. BMMA ने देशभरात शैक्षणिक मोहीम राबवून स्त्रियांना कुराणातील समानतेच्या अर्थाचा नव्याने परिचय करून दिला. त्यांचे म्हणणे होते की इस्लामचा मूळ संदेश न्याय, समानता आणि करुणेचा आहे. मग पुरुषसत्ताक समाजाने 'तीन तलाक' आणि 'निकाह हलाला' सारख्या प्रथा का कायम ठेवल्या? इचचअ ने २०१६ मध्ये 'कुराण आधारित विवाहविच्छेद कायद्याचा मसुदा' तयार करून सरकारकडे सादर केला.

याच काळात शहरबानो बेगमने २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात तोंडी तीन तलाकविरोधात याचिका दाखल केली. ही लढाई शहाबानोच्या पुढची पायरी होती. शहरबानोला तिच्या पतीने २०१५ मध्ये फक्त एका पत्राद्वारे तलाक दिला होता. तिने ठामपणे सांगितले की हा अन्याय धर्मविरोधी नाही, तर स्त्रीविरोधी आहे. २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'तोंडी तीन तलाक' घटनाबाह्य ठरवले आणि २०१९ मध्ये केंद्र सरकारने त्यावर बंदी घालणारा कायदा पारित केला. हा निर्णय केवळ एका स्त्रीचा विजय नव्हता; तो मुस्लिम स्त्रियांच्या पाच दशकांच्या प्रबोधनाचा परिणाम होता, ज्याची बीजे हमीद दलवाईंनी पेरली होती.

परंतु कायद्यांनी सर्व समस्या सुटल्या नाहीत. कारण **मुस्लिम स्त्रियांना केवळ धर्मनिरपेक्ष न्यायव्यवस्थेतील अन्याय नाही, तर सामाजिक आणि राजकीय हिंसेचाही सामना करावा लागतो. २००२ च्या गुजरात दंगलीत बिल्कीस बानोच्या पोटी अपत्य असताना म्हणजे ती गरोदर असताना तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला आणि तिच्या कुटुंबातील चौदा जणांची हत्या करण्यात आली. बिल्कीस बानोने दोन दशकांहून अधिक काळ लढा देऊन न्याय मिळवला. परंतु २०२२ मध्ये दोषींना गुजरात सरकारने 'सद्वर्तनाच्या' कारणावरून मुक्त केल्यावर तिच्या न्यायालयावरील विश्वासाला पुन्हा तडा गेला. तिचा संघर्ष हे दाखवतो की पुरुषसत्ताक स्त्रीविरोध आणि धर्मांध राजकारण हातात हात घालून चालते.**

अशा कठीण पार्श्वभूमीवर मुस्लिम स्त्रिया केवळ न्यायालयातच नव्हे, तर रस्त्यावरही उतरल्या. २०१९–२० मधील 'शाहिनबाग आंदोलन' हे त्याचे सर्वात जिवंत उदाहरण ठरले. नागरिकत्व सुधारणा कायदा (CAA) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (NRC) विरोधात दिल्लीच्या शाहिनबाग परिसरात हजारो मुस्लिम स्त्रिया सलग तीन महिने शांततामय आंदोलन करत राहिल्या. त्यांच्या हातात कुराण नव्हते, तर संविधान होते. त्यांनी 'हम कागज नहीं दिखाएंगे' या घोषणेद्वारे भारतीय नागरी हक्कांच्या लढ्याला धर्मनिरपेक्ष आधार दिला. **शाहिनबागच्या आंदोलनाने जगाला दाखवून दिले की मुस्लिम स्त्रिया केवळ धर्माच्या चौकटीत विचार करणाऱ्या नाहीत; तर त्या भारतीय लोकशाहीच्या रक्षणकर्त्या आहेत. या चळवळींमुळे मुस्लिम स्त्रियांमध्ये**

**आत्मभान वाढले. त्यांना जाणवले की पितृसत्ता आणि धार्मिक राजकारण दोन्ही त्यांच्या विरोधात आहेत. एका बाजूला कट्टर धार्मिक नेतृत्व स्त्रियांना ''धर्मरक्षक'' म्हणून वापरते, तर दुसऱ्या बाजूला हिंदुत्ववादी राजकारण त्यांना ''धर्माच्या नावाखाली मागास'' म्हणून दाखवते.** या दुहेरी आघाडीवर लढताना स्त्रिया स्वतःच्या स्वातंत्र्याचा अर्थ पुन्हा लिहू लागल्या आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळ, इचअ, मुस्लिम महिला मंच, अस्मिता, मुस्लिम महिला परिषद, मुस्लिम महिला ट्रस्ट, बेगम रहमत अली फाउंडेशन, आणि शायरा बानो ट्रस्ट अशा विविध संघटनांनी देशभरात जनजागृतीसाठी कार्य सुरू ठेवले आहे. त्यांचा भर केवळ धार्मिक सुधारणा नव्हे, तर सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणावर आहे. महिला साक्षरता, व्यावसायिक प्रशिक्षण, कौटुंबिक समुपदेशन, आणि कायदेशीर सल्ला केंद्रे ही त्यांच्या कार्याची मुख्य साधने आहेत. या चळवळींनी मुस्लिम स्त्रियांना पीडितेच्या भूमिकेतून बाहेर काढून 'निर्णय घेणाऱ्या नागरिकां'मध्ये रूपांतर केले आहे.

आज अनेक शिक्षित मुस्लिम स्त्रिया पत्रकारिता, कायदा, शिक्षण, सामाजिक कार्य, आणि राजकारणात सक्रिय आहेत. त्यांना 'फेमिनिझम' ही पाश्चात्त्य संकल्पना वाटत नाही; उलट त्या सांगतात की कुराणाच्या मूळ तत्त्वात स्त्री-पुरुष समानतेची बीजे आहेत. उदाहरणार्थ, झाकिया सोमन म्हणतात, ''इस्लाममध्ये 'तक्वा' म्हणजे ईश्वरभक्ती जी सांगितलेली आहे ती लिंगावर अवलंबून नाही.'' अशा प्रकारे धर्म आणि स्त्रीवाद यांचा समन्वय घडवून भारतीय मुस्लीम स्त्रीवादाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. तथापि, आव्हाने अजूनही मोठी आहेत. भारतातील मुस्लिम समाज आर्थिकदृष्ट्या मागास आहे. सच्चर समितीच्या अहवालानुसार मुस्लिम महिलांपैकी बहुतेक स्त्रिया निरक्षर आहेत आणि शहरी भागातही रोजगाराचे प्रमाण अत्यल्प आहे. शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधांचा अभाव त्यांना सामाजिक असमानतेच्या दुष्टचक्रात ढकलतो. दुसरीकडे, सामाजिक माध्यमांवर वाढत्या धर्मांधतेमुळे बुरखा किंवा हिजाब घालणाऱ्या स्त्रियांना लक्ष्य केले जाते, त्यांना राष्ट्रविरोधी म्हणून दाखवले जाते. यामुळे काही स्त्रिया असुरक्षिततेतून अधिक धर्माभिमुख होतात. पण हीच परिस्थिती त्यांना पुन्हा विचार करायला भाग पाडते की धर्मरक्षण हे पुरुषांचे काम नसून, न्याय आणि समानतेसाठी लढणे हेच खरे धर्मरक्षण आहे.

**गेल्या पन्नास वर्षांतील मुस्लिम स्त्रियांचा प्रवास म्हणजे एका समाजाच्या जागृतीचा प्रवास आहे. १९६६ मध्ये हमीद दलवाईंनी पेरलेले बीज आज विविध चळवळींच्या रूपात फुलले आहे. त्यांनी सांगितलेले धर्मनिरपेक्ष, विचारस्वातंत्र्यवादी मूल्य आज शहरबानो, बिल्कीस बानो, आणि शाहिनबागच्या स्त्रियांमध्ये साकार होत आहे. मुस्लिम स्त्रिया आता केवळ न्यायाची मागणी करत नाहीत, तर त्या समाजाच्या विचारसंस्कृतीला आव्हान देत आहेत. गेल्या पन्नास वर्षांतील हा प्रवास पाहिला तर मुस्लिम स्त्री प्रश्नाचा आवाका खूप वाढलेला दिसतो.** सुरुवातीला 'तोंडी तलाक' किंवा 'बहुपत्नीत्व' अशा काही धार्मिक प्रथांविरोधातील लढ्यापासून सुरुवात झाली असली तरी आज ती लढाई नागरी हक्क, शिक्षण, रोजगार, समान कायदा, आणि धर्मनिरपेक्षतेच्या रक्षणापर्यंत पोहोचली आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळासारख्या संघटनांनी समाजाला विचारमंथन करण्यास भाग पाडले आहे. पण धार्मिक राजकारण आणि पितृसत्तेने त्यावर वारंवार हल्ले केले. तथापि, प्रत्येक वेळी मुस्लिम स्त्रिया नव्या उर्जेने उभ्या राहिल्या-कधी न्यायालयाच्या पायऱ्यांवर, कधी रस्त्यावर, तर कधी शिक्षणाच्या क्षेत्रात. आज मुस्लिम स्त्रिया दोन आघाड्यांवर लढत आहेत. एका बाजूला पितृसत्ता, तर दुसऱ्या बाजूला धर्माधारित राजकारण. या दोन्ही शक्ती स्त्रीच्या स्वातंत्र्यावर घाला घालतात. पण हीच लढाई भारतीय लोकशाहीला अधिक सशक्त करते. कारण ज्या समाजात स्त्रिया जागृत होतात, तो समाजच खऱ्या अर्थाने आधुनिक होतो. मुस्लिम स्त्रिया आता स्वतःचा प्रश्न स्वतः मांडत आहेत, स्वतःच्या भविष्याचा निर्णय स्वतः घेत आहेत.

या सर्व संघर्षाचा सारांश असा की मुस्लिम स्त्रिया आज दोन प्रकारच्या पितृसत्तेविरुद्ध उभ्या आहेत. एक धार्मिक पितृसत्ता आणि दुसरी राजकीय पितृसत्ता. दोन्ही त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणतात, पण या स्त्रिया दोन्हींचा प्रतिकार करत आहेत. त्यांनी दाखवून दिले की स्त्रियांची मुक्ती ही कोणत्याही धर्माच्या विरोधात नसते; ती अन्यायाच्या विरोधात असते. शेवटी, या प्रवासातून आपल्याला हे स्पष्ट होते की **मुस्लिम स्त्रियांचा प्रश्न केवळ 'हिजाब', 'बुरखा' किंवा 'तलाक'पुरता मर्यादित नाही. तो भारतीय समाजातील समानता, धर्मनिरपेक्षता आणि स्त्रीस्वातंत्र्याच्या व्यापक संघर्षाचा भाग आहे. शहाबानो बेगमपासून शाहिनबागपर्यंतचा हा प्रवास दाखवतो की स्त्रिया आता स्वतःचे भविष्य स्वतः घडवत आहेत. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने लावलेली विचारांची मशाल आज हजारो स्त्रियांच्या हातात प्रज्वलित आहे, आणि हीच मशाल पुढे भारतीय समाजाला खऱ्या अर्थाने प्रगत आणि मानवतावादी बनवेल. म्हणूनच मुस्लिम स्त्रियांचा प्रश्न 'हिजाब-बुरखा' या चौकटीत अडकवून ठेवू नये. त्यांचा लढा हा सामाजिक न्याय, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, आणि विचारस्वातंत्र्य या मुद्द्यांवर सुरू आहे.** शहाबानो, शहरबानो, बिल्कीस बानो, शाहिनबागच्या स्त्रिया या सर्व भारतीय लोकशाहीचे नवे स्तंभ आहेत. त्यांचा संघर्ष अजून सुरू आहे, पण त्यांनी दाखवून दिले आहे की, धर्म आणि पितृसत्ता यांच्या दुहेरी बेड्या तोडूनही स्त्री स्वतःचा मार्ग तयार करू शकते. मुस्लिम सत्यशोधक मंडळासारख्या संस्थांनी आणि प्रगत कार्यकर्त्यांनी ज्या 'विचाराच्या मशाली' प्रज्वलित केल्या, त्या आता अनेक हातांत गेल्या आहेत. मुस्लिम स्त्रियांचा हा जागृतीचा प्रवास केवळ मुस्लिम समाजासाठी नाही, तर संपूर्ण भारतातील स्त्रियांसाठी प्रगतीचे प्रतीक आहे. कारण जिथे स्त्री मुक्त होते, तिथे समाज खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतो.

***जगदीश काबरे***

(लेखक समाजचिंतक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारक आहेत.) सौजन्य : मुस्लिम सत्यशोधक पत्रिकेतील लेख...





*नवनिर्वाचित ठाणे-शहर काँग्रेस अध्यक्ष मा. राहुल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार...२५ जुलै-२०२५ सायं. ७.०० वा. काँग्रेस मध्यवर्ती कार्यालयापासून ते स्टेशनच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत Gen-Z समर्थनार्थ निघालेल्या मोर्चातील क्षणचित्रे....*




# छत्रपती शाहू महाराजांचा जन्मदिवस (२६ जून) हा महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' म्हणून पाळला जाण्याची महत्त्वपूर्ण कारणे व तत्कालीन परिस्थितीचं अवलोकन :

१८९४ साली छत्रपती शाहू महाराजांचा' राज्याभिषेक' झाला. नंतर त्यांनी आपल्या राज्याचा दौरा केला. डोंगरदऱ्यात राहणाऱ्या कष्टकरी, श्रमकरी, शेतकरी, वंचित, उपेक्षित, भूमिहीन प्रजाजनांचे दुःख पाहून त्यांचे मन हेलावले. छत्रपतीच्या अंतःकरणा मध्ये प्रचंड वात्सल्य होते. ते जसे स्वाभिमानी होते, तसेच ते प्रेमळ होते. आपल्या राज्यात आमुलाग्र बदल करण्याचा संकल्प त्यांनी केला. **शाहू महाराजांनी आपल्या राज्यात शिक्षणाचा प्रसार केला. प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी सक्तीचे आणि मोफत केले. ''शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही,'' हे त्यांचे विचार होते. मंदिरातील पैसा शिक्षणासाठी वापरला. सर्व जाती धर्मातील मुलांसाठी कोल्हापुरात वसतिगृहांची स्थापना केली. मराठा बोर्डिंग, मुस्लिम बोर्डिंग, जैन बोर्डिंग, दलित बोर्डिंग, लिंगायत बोर्डिंग इत्यादी बोर्डिंगची स्थापना शाहू महाराजांनी केली. ''बोर्डिंग सिटी'' अशी कोल्हापूरची ओळख होती. पुणे येथील श्री. शिवाजी मराठा सोसायटी, ऑल इंडिया श्री. शिवाजी मेमोरियल सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, नाशिक येथील उदाजी मराठा शिक्षण संस्था, नागपूर येथील शिक्षण संस्था, चेन्नई येथील शिक्षण संस्था अशा अनेक शैक्षणिक संस्था उभारण्यात शाहू महाराजांचा पुढाकार होता.**

राजर्षी शाहू महाराजांनी ''१९१७ साली विधवा पुनर्विवाहाचा कायदा'' केला. ''१९१९ साली आंतरजातीय विवाहाचा कायदा केला.'' बाजारपेठ स्थापन केली. ''जयसिंगपूर शहराची स्थापना केली.'' त्यांनी भारतातील सर्वाधिक जलसाठ्याचे ''राधानगरी हे पहिले धरण भोगावती नदीवर १९०८ साली बांधले.'' १८९९ साली वेदोक्ताचा अधिकार नाकारणाऱ्या पुरोहिताची त्यांनी हकालपट्टी केली. बहुजन पुरोहित तयार करणारी शिवाजी वैदिक शाळा त्यांनी सुरू केली. ''डोणे नावाचे धनगर विद्वान त्या शाळेचे प्राचार्य होते.'' भास्करराव जाधव यांनी 'घरचा पुरोहित' नावाचे पुस्तक लिहिले. शाहू महाराजांनी आपल्या राज्यात कधी भेदाभेद केला नाही. याउलट उपेक्षित, वंचित, भूमिहीन, अस्पृश्य, शेतकरी, कष्टकरी, श्रमकरी जातींना त्यांचा डावललेला हक्क अधिकार मिळावा, यासाठी १९०२ साली आरक्षणाची सुरुवात केली. भारतात आरक्षणाचा पाया घालणारा राजा म्हणजे शाहू महाराज होय. प्रशासनातील एकाधिकारशाहीला त्यांनी पायबंद घातला. त्यांनी सर्व जातींना प्रशासनात प्रतिनिधित्व दिले. ''शाहू महाराज हे बुद्धिप्रामाण्यवादी होते. त्यांनी भविष्य, पंचांग, मुहूर्त कधीही पाहिले नाही.'' ''भविष्य सांगण्यासाठी आलेल्या जोतिष्याला तुरुंगात डांबून त्याला बुद्धिप्रामाण्यवादाचे महत्व पटवून दिले.'' ''त्यांनी भाकडकथा, पुराणकथा नाकारून



प्रतिगामी विचारांना नेस्तनाबूत केले.'' त्यांनी ग्रंथप्रामान्य नाकारले. आपल्या राज्यात समता प्रस्थापित करण्यासाठी शाहू महाराजांनी आपले राजेपद पणाला लावले. ज्या जातींना गुन्हेगार ठरवण्यात आलेले होते, अशा जातीवरचे निर्बंध राजांनी उठवले. त्यांना नियमित हजेरीतुन मुक्त केले. त्यांना आपल्या राज्याच्या संरक्षण खात्यात महत्त्वाच्या पदावरती नेमले.

**''अस्पृश्यता नष्ट व्हावी, यासाठी ते अस्पृश्याच्या घरी जेवले.'' अस्पृश्यांना आपल्या राजवाड्यावर स्नेहभोजन ठेवले. ''अन्यायग्रस्त गंगाराम कांबळेला न्याय देऊन त्याला हॉटेल टाकून दिले.'' ''त्या हॉटेलला प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, यासाठी स्वतः शाहू महाराज आपल्या सहकाऱ्यांना घेऊन हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी जात असत. महार, मांग, चांभार इत्यादी पैलवाना बरोबर देशभरातून आलेल्या पैलवानांनी कुस्ती खेळावी म्हणून त्यांना जाट, सरदार, पंडित अशी नावे दिली. जातिभेद नष्ट व्हावा यासाठी शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाला चालना दिली.** याची सुरुवात त्यांनी स्वतःच्या कुटुंबा पासून केली. त्यांनी ''आपली बहीण चंद्रप्रभादेवी'' यांचा विवाह इंदोरचे यशवंतराव होळकर यांच्या बरोबर निश्चित केला, तो पुढे राजाराम महाराजांनी लावून दिला, असे सुमारे २५ आंतर जातीय विवाह घडवून आणले, यातून त्यांनी मराठा, धनगर आणि इतर जाती एकमेकांचे विरोधक नसून नातेवाईक आहेत, हे सिद्ध केले. म्हणजे शाहू महाराज हे केवळ ''बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते.''

छत्रपतींची परंपरा जातीव्यवस्था मोडणारी व समता प्रस्थापित करणारी परंपरा आहे, छत्रपतींची परंपरा जातीव्यवस्था पाळणारी विषमतावादी परंपरा नाही, छत्रपतींची परंपरा प्रगल्भ परंपरा आहे, ती संकुचित नाही. **शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उच्च शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत केली. 'मूकनायक' या नियत कालिकासाठी मदत केली. शाहू महाराज म्हणाले, ''बाबासाहेब आंबेडकर हे देशाचे नेते आहेत आणि तेच खरे लोकमान्य आहेत''. शाहू महाराजांच्या मुला मुलींच्या लग्नात करवले म्हणून भटक्या विमुक्त, दलित जातीतील समवयस्क मुला मुलींना सोबत घेतले होते, जेणेकरून विषमता नष्ट व्हावी व सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, हे शाहू महाराजांचे धोरण होते.** शाहू महाराजांनी आपल्या राज्यात हिंदू मुस्लिम हा भेद केला नाही. मुस्लिमांच्या शिक्षणासाठी त्यांनी ''मुस्लिम बोर्डिंगची'' स्थापना केली. आपल्या राज्यातील गरिबातल्या गरीब मुस्लिमांना कुराण मराठी भाषेत वाचता यावे, यासाठी अरबी भाषेतील कुराणाचे मराठी भाषांतर करण्यासाठी २५ हजार रुपयाची देणगी दिली. शंभर वर्षांपूर्वीची ही रक्कम खूप मोठी रक्कम आहे. शाहू महाराजांनी पाटगावच्या मौनी बाबाच्या मठाच्या उत्पन्नातील रक्कम तेथील मुस्लिमांच्या मशिदीच्या बांधकामासाठी दिली, तर रुकडीतील पिराच्या देवस्थानाच्या उत्पन्नातील रक्कम तेथील अंबाबाई मंदिराच्या बांधकामासाठी व दिवाबत्तीसाठी दिली, इतका सामाजिक सलोखा शाहू महाराजांच्या राज्यात होता.

**शाहू महाराजांनी ''शाहीर लहरी हैदर, चित्रकार आबालाल रहमान, गानमहर्षी अल्लादिया खाँसाहेब, मल्लविशारद बालेखान वस्ताद,गायक अभिनेता बालगंधर्व'' यांना सर्वतोपरी मदत केली. शाहू महाराजांनी सामाजिक समतेसाठी आणि सामाजिक सलोख्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले, शाहू महाराज म्हणतात, ''शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. जातीभेद हा मानवी विकासापुढील मोठा अडथळा आहे. औषधाला सुद्धा दारू पिऊ नका. अन्न क्षेत्राला पैसे देण्यापेक्षा शिक्षणाला पैसे द्या, ज्यातून स्वावलंबी, स्वाभिमानी पिढी निर्माण होईल''. अशा क्रातिकारक विचारांचे शाहू महाराज होते.** शाहू महाराजानी आपल्या राज्यात सर्वांचा विकास आणि शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी सनातनी व्यवस्थे विरुद्ध उघडपणे संघर्ष केला, परंतु आज सामाजिक वातावरण बिघडवले आहे, जातीजातीत आणि धर्माधर्मात विष पेरले जात आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. सर्व समाज बांधवांनी एकोपा जपावा, हे शाहूचरित्र सांगते. शाहू महाराजांचा सामाजिक सलोखा आपण कायम ठेवणे, हेच खरे शाहू प्रेम आहे. त्यांच्या विचारांचे आपण आचरण करूया. आज शाहू महाराजांची जयंती आहे, जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

***...डॉ. श्रीमंत कोकाटे***

# रामराज्यात चौकीदार चोर!

**अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिर आणि घोटाळ्यांची मालिका खूप मोठी आहे. जिथे बाबरी मशीद होती; तिथे आताचे मंदिर उभे नाही; हाच मोठा घोटाळा आहे.**

***राम नाम की लूट है,***
***लूट सके तो लूट।***
***अंतकाल पछताएगा,***
***जब प्राण जाएगे छूट।।***

संत कबिरांचा हा 'दोहा' अयोध्येतल्या ''रामजन्मभूमी मंदिर''च्या कारभाऱ्यांनी शब्दशः आचरणात आणला आणि भाविकांच्या दान-देणग्यांवर ७ कोटी रुपयांचा डल्ला मारल्याचे प्रथमदर्शनी उघडकीस आले. (हा आकडा १०० पटीने वाढण्याची शक्यता सांगितली जाते. असो.) इतक्याच रकमेचे म्हणजे, साडेचार किलो सोन्याचे दागदागिने केरळातील शबरी मंदिराच्या कारभाऱ्यांनीच लंपास केल्याचे यापूर्वीच उघड झाले आहे. तिरुपतीच्या वेंकटेश्वर मंदिरातील (तामिळनाडू) ''लाडू घोटाळा'' २५० कोटी रुपयांचा; तर वैष्णोदेवी मंदिरातील (जम्मू-काश्मीर) ''चांदी घोटाळा'' ५५० कोटी रुपयांचा आहे. या दोन्हीच्या तुलनेत राम मंदिर आणि शबरीमाला मंदिराचे घोटाळे किरकोळ म्हटले पाहिजे. राम मंदिर वगळता इतर तीन मंदिरे ही जागृत आणि नवसाला पावणारी देवस्थानं आहे. पण दानात आणि प्रसादात चोऱ्या होत असताना तिथले देव-देवता झोपलेले होते. अयोध्येचे राम मंदिर हे राजकीयदृष्ट्या जागृत मंदिर आहे. ते मंदिर-मशीद वादाच्या आंदोलनातून निर्माण झाले आहे.

हे आंदोलन कधीच शुद्ध धार्मिक वा आध्यात्मिक हेतूने केलेले नव्हते. ते कायम वादग्रस्त आणि घोटाळ्याचे राहिलेले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दोनच वर्षांत अयोध्येतील बाबरी मशीदमध्ये रामलल्लाची मूर्ती घुसवून चमत्काराची अफवा पसरवण्यात आली. तेव्हापासून मंदिर-मशीद वादाचा विषय न्यायप्रविष्ट झाला. यानंतर १९८६-८८ या काळात शाहबानो पोटगी प्रकरणाने मुस्लीम कट्टरता वादाचा भडका उडाला. त्याला तोडीसतोड उत्तर देण्यासाठी संघ-भाजप परिवाराने लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली ''रामजन्मभूमी मुक्ती रथयात्रा'' काढली. याच दरम्यान, ''विश्व हिंदू परिषद''तर्फे छोट्या बाटल्यांतून गंगाजल विक्रीच्या यात्रा निघाल्या. या विक्रीतून जमलेल्या पैशांचा हिशेब कधीच जाहीर झाला नाही. **देश-विदेशातून मंदिर निर्माणासाठी अयोध्येत जमवलेल्या विटांचे पुढे काय झालं, ते रामसेवकांनी कधी विचारलं नाही; तेच २०२२ मध्ये राम मंदिर निर्माणाच्या जमवलेल्या निधीबाबत झाले. त्याआधी मंदिर-मशीद खटल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधिशांच्या खंडपीठाने लावला. पण निकालपत्रावर तीनही न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्या नाहीत. मंदिराचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे मूर्ती प्राणप्रतिष्ठा विधी, ध्वजारोहण विधी आणि उद्घाटन समारंभाला ४ पैकी एकही शंकराचार्य आले नाहीत. शेकडो कोटी रूपये खर्च केलेल्या मंदिराच्या छप्पराला पहिल्या पावसात गळती लागली.**

अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिर आणि घोटाळ्यांची ही मालिका खूप मोठी आहे. जिथे बाबरी मशीद होती; तिथे आताचे मंदिर उभे नाही; हाच मोठा घोटाळा आहे. तिथे जर रामजन्मभूमी मंदिर उभे करायचे नव्हते, तर बाबरी मशीद पाडण्याचे कारण काय? बाबरी मशीद पाडताना मी पाहिले आहे. तेव्हा पत्रकार म्हणून अयोध्येत हजर होतो. त्यावेळी जे वाटले-लिहिले; त्या मताशी आताही ठाम आहे. बाबरी मशीद ही परकीय आक्रमकांनी किती क्रूरपणे हिंदूंना अपमानित करून भारतावर राज्य केले, ह्याचा पुरावा होता. त्याच्या बाबरीवरच्या खुणा पाहताक्षणी संताप आणायच्या. त्या नष्ट करण्याचे नादान काम संघ-भाजप परिवाराने केले आहे. ही हरामखोरी होती. म्हणूनच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीआधी अयोध्येत रामजन्मभूमी मंदिर उभारणे, ही ''संघ-भाजप''साठी मजबुरी ठरली.




**मंदिर उभारणी हा संघ-भाजप परिवाराचा एकच एक उद्देश असता; तर बाबरी मशिदीचे पतन होताच, मंदिर उभारणीचे काम सुरू झाले असते. तसे घडले नाही. त्याचप्रमाणे, हिंदू खरंच रामजन्मभूमी मंदिर निर्माणबाबत आग्रही असते; तर त्यांनी मंदिरासाठी जमिनी दान केल्या असत्या; त्या चढ्या भावात मंदिराच्या ट्रस्टला विकल्या नसत्या. हा जमिनींनी खरेदीचा घोटाळा मंदिरातल्या दान-दागिन्यांच्या लंपासगिरीपेक्षा कित्येक पटीने मोठा आहे. रामजन्मभूमी मंदिर निर्माणासाठी ''श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट''तर्फे जमीन खरेदी करण्यात आली. त्यातही मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेत.**

नमुन्यादाखल दोन उदाहरणं -

अ) कुसुम पाठक यांच्याकडून १८ मार्च २०२१ रोजी संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी राजू तिवारी व सुलतान अन्सारी यांनी दोन कोटी रुपयांत जमीन खरेदी केली; आणि त्याच दिवशी पाच मिनिटांनंतर; म्हणजे १८ मार्च २०२१ रोजी ७ वाजून १५ मिनिटांनी; तीच जमीन ''श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट''ने अठरा कोटी रुपयांना विकत घेतली.

ब) महंत देवेंद्र प्रसाद यांनी दीपनारायण उपाध्याय यांना ८९० चौरस मीटर जमीन २० फेब्रुवारी २०२१ रोजी २० लाख रुपयांना विकली. ती जमीन दीपनारायण उपाध्याय यांनी ३ महिन्यांनी; २१ मे २०२१ रोजी ''रामजन्मभूमी मंदिर ट्रस्ट''ला अडीच कोटी रुपयांना विकली. म्हणजे ३ महिन्यांत जमिनीची किंमत १२ पटीने वाढली. या सौद्यात ''रामजन्मभूमी ट्रस्ट''चे सदस्य अनिल मिश्रा आणि राजकुमार दास हे साक्षीदार होते. ही दोन्ही प्रकरणं ''आम आदमी पार्टी''चे राज्यसभा खासदार संजय सिंह यांनी जाहीर केली आहेत.

या जमीन घोटाळाप्रकरणी ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता ते म्हणाले, ''शंभर वर्षांपासून आम्ही आरोपच ऐकत आहोत. आमच्यावर महात्मा गांधींच्या हत्येचाही आरोप झाला होता. आरोपाची आम्ही चिंता करत नाही. तुम्हीसुद्धा करू नका.'' विशेष म्हणजे, दोन्ही सौद्यांमध्ये साक्षीदार समान आहेत. मंदिर उभारणीचा पायाच इतका भ्रष्टाचाराने भुसभुशीत झाला असेल, तर दान-देणग्या सत्पात्री आणि सुरक्षित कशा राहणार? महिपाल सिंग हे ''श्री रामजन्मभूमी मंदिर''चे लेखा प्रभारी म्हणजे ''अकाउंट्स इन चीफ'' होते. तेव्हा त्यांनी व्यवस्थापनात आणि देणग्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचे आरोप पुराव्यांसह केले होते. ते असे होते -

अ) रोख रकमेची मोजणी करताना, प्रत्यक्ष रकमेपेक्षा कमी रकमेची व्हाउचर्स बनवली जातात. या पद्धतीचा वापर करून शिल्लक रक्कम लंपास केली जाते.

ब) भाविकांनी देवा चरणी अर्पण केलेले सोने, चांदी आणि इतर मौल्यवान वस्तूंचा कोणताही अधिकृत हिशोब ठेवला जात नाही. तसेच, या किमती वस्तूंची भाविकांना तपशिलासह पावती दिली जात नाही. ही प्रशासकीय उदासीनता संशयास्पद आहे.

क) **भाविक मूर्ती चरणी रोख रक्कम अर्पण करतात किंवा मूर्तीला सोन्या चांदीचे दागदागिने घालतात; त्याला ''चढावा'' म्हणतात. त्याचे ''सीसीटीव्ही''मध्ये चित्रीकरण होते. ते दान-देणग्यांच्या हिशेब तपासणीसाठी महत्त्वाचे असते. हे ठाऊक असूनही सीसीटीव्ही फुटेज मुद्दाम डिलीट (नष्ट) करण्यात येते. जेणेकरून तेथील हालचालींचा कोणताही पुरावा उरणार नाही. (उत्तरप्रदेश सरकारने चौकशीसाठी नेमलेल्या विशेष पोलिस पथकाला उपलब्ध ''सीसीटीव्ही फुटेज''मधून ७० चोऱ्या सापडल्यात.) ही आर्थिक गैरव्यवहाराची आणि भ्रष्टाचाराची सविस्तर माहिती महिपाल सिंग यांनी ''श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट''चे सरचिटणीस चंपत राय बन्सल यांना दिली होती. मात्र, त्यांनी दोषींवर कडक कारवाई करण्याऐवजी महिपाल सिंग यांनाच त्यांच्या पदावरून हटवलं.**

अयोध्येतील राम मंदिरातील सेवेकऱ्यांनी दान-देणग्यांवर मारलेला करोडोंच्या डल्ला जाहीर होताच, ''शिवसेना'' नेते व राज्यसभा खासदार यांनी ''उद्धव ठाकरे यांनी राम मंदिराला दिलेली ४ किलोची चांदीची वीट आणि १ कोटी रुपये कुठे आहेत,'' असा प्रश्न विचारलाय. ह्या दान-देणगीची पावती अद्याप मिळाली नाही, अशीही त्यांची तक्रार आहे. ह्या दोन्ही बाबी त्यांच्या तल्लख बुद्धीला साजेशा नाहीत. दुष्काळ पडला. प्रजा भुकेने कासावीस झाली. म्हणून दामाजीपंताने विठ्ठलाचे नाव घेत धान्याची सरकारी कोठारं लोकांसाठी खुली केली.

त्याने चवताळलेल्या आदिलशहाने ''धान्याचे पैसे दे, नाहीतर फाशीच्या शिक्षेला तयार राहा,'' असं फर्मान दामाजीपंताच्या विरोधात काढलं. दामाजी प्रामाणिक नोकर असल्याने कफल्लक होता. त्याने ''विठ्ठलाचा धावा'' सुरू केला. आणि भर दरबारात विठुराया ''विठू महार''च्या रूपात हजर झाला. त्याने दामाजीच्या माथ्यावर आदिलशहाने ठेवलेले कर्ज फेडले आणि दामाजीचे प्राण वाचवले. अशी आख्यायिका आहे. हा प्रसंग ''झाला महार पंढरीनाथ'' या चित्रपटात आहे. त्यावर चित्रित केलेल्या गाण्यामध्ये ग. दि. माडगूळकर लिहितात :

*खळखळा ओतल्या मोहरा*
*त्याची पावती करुनी द्या :*

सारांश, पावती जेव्हाच्या तेव्हा मागायची; घ्यायची असते. मुद्देमाल गुल झाल्यावर पावती काय मागतात? आणि आता ती मिळाली; तर ती दाखवून दिलेलं दान-देणगी परत मागणार का? मुळात, उद्धव ठाकरे यांनी दान-दक्षिणा देण्यापूर्वी आपल्या आजोबांनी; ''प्रबोधन''कार ठाकरे यांनी लिहिलेली ''देवळांचा धर्म, धर्माची देवळे'' हे छोटी पुस्तिका नजरेखालून घातली असती, तर आज उलटी-पालटी कसरत करावी लागली नसती.

*देव-देवळे भटी सापळे*
*घातक झाले देशा -*
*मोडा तोडा, उलथुनि पाडा*
*उखडा त्याच्या पाशा-*

असे थेटपणे लिहिणारे-बोलणारे, **''प्रबोधन''कार ठाकरे ''देवळांचा धर्म, धर्माची देवळे''मध्ये लिहितात, ''देवळातील मूर्ती म्हणजे देव नव्हे! केवळ धोंडा. भातुकलीच्या खेळातल्या बाहुलीसारखी क्षुद्र वस्तू. हे पुजारी, भटदलालांपासून ते तिच्यापुढे कपाळे घासणाऱ्या भक्त-भक्तिणींपर्यंत सर्वांना स्वच्छ माहिती असते. असल्या धोंड्याची पूजा-प्रार्थना करून, आत्मोन्नती होणे शक्य नाही; आणि प्राणावर बेतले तर हा शृंगारलेला दगड स्वत:चे किंवा भक्तांचे मुळीच संरक्षण अगर तारण करू शकणार नाही, हे प्रत्येक हिंदूला कळते. तरीही देवळातल्या घंटा बडवायला सांज-सकाळ कोट्यवधी हिंदू का जातात?** बाप, आजे, पणजे गेले म्हणून जातात; का, त्यांना एखादी गुप्त जादू तेथे ओढून नेते! हिंदू लोकांची देवळ्या देवांविषयीची भावना सरळ आणि अत्यंत प्रेमाची असती; तर हिंदुस्थानात मुसलमानी बडग्याला एकही देऊळ व देव नक्कीच बळी पडला नसता! अर्थात, नाटके, सिनेमे, तमाशाची थिएटरे जशी क्षणभर विरंगुळ्याची ठिकाणे असतात. करमणूकच्या करमणूक आणि पटला काही उपदेश तर पटला; नाही तर निसटला! यापेक्षा देवळांची विशेष किंमत हिंदू लोकांनी बाळगलेली दिसत नाही. तरीही देव-देवळांविषयी शाब्दिक प्रेमाचा हिंदू जिव्हेचा धबधबा पाहावा; तो त्याच्या धडधडाटापुढे गिरसप्पा, नायगाराच्या कानठळ्या बसतात! हे काय भटीबंगाल आहे? हे भटबंगाल हिंदुस्तानाच्या नकाशात सापडणारे नसून ते थेट भटाच्या पोटात आहे! देवळांचा धर्म म्हणजे भटाच्या पोटाचे गुप्त मर्म आहे. या मर्माचे वर्म अफाट भटेतरांना कधीच उमगू नये, म्हणून भटांनी अठरा पुराणांची पैदास करून ठेवलेली आहे. गीता व उपनिषद आदी विचार-क्रांतिकारक आणि सत्यशोधक ग्रंथ कितीही असले, तरी देवळांवर देह जगवणाऱ्या या भूदेवांचा विशेष मारा पुराणांवरच असतो. पुराणांच्या पचनी पडलेला प्रत्येक प्राणी; ईश्वरविषयक कल्पनेत इतका पागल बनतो की, दगड्या देवाच्या पायाऐवजी तो भटाच्या पायावर टाळकी घासतो आणि त्याचे पाय धुतलेले पाणी ''पवित्र तीर्थ'' म्हणून घटाघटा पितो. देवळात कथा, कीर्तने, पुराणे, प्रवचने होतात. पण सर्वांची झाप छिनाल भागवतावर आणि पाचकळ पुराणांवरच असते.''

**१८ पुराणांत तिसरे ''विष्णू पुराण'' आहे. पुराणांना ''प्रबोधन''कार पाचकळ म्हणतात. कारण त्यात देवलोकांच्या बऱ्याच भानगडी आहेत. त्यातही कल्पनाविलास ठासून भरलाय. अशा भगवान विष्णूचा सातवा अवतार म्हणजे प्रभू रामचंद्र! ज्याचा जन्मच कल्पना-विस्तारात झालाय; त्याचे जन्मस्थानही काल्पनिकच असणार! पण त्यातूनही आपल्या देशात अधर्म आणि दहशतीचे; हिंदू-मुस्लिम द्वेषाचे रामायण-महाभारत दोन्ही एकाच वेळी घडलं; घडत आहे. संत गाडगे महाराज सांगत, ''देवळात पुजाऱ्याचे पोट असते.'' त्या पोटाला आता ट्रस्टी-पदाधिकारी ह्या चौकीदारांची; आणि देवळाचा कारभार शासकीय ट्रस्ट अंतर्गत असेल, तर त्यांना नेमणाऱ्या बड्या चौकीदारांची पोटे जोडलेली असतात. ही साखळी तयार होते, तेव्हा भ्रष्टाचार सराईतपणे होतो.** असेच सर्वच धर्मांच्या धर्म/प्रार्थनास्थळांमध्ये चालते. फक्त झोलझपाट्यात भिन्नता असते. कोल्हापूर, सांगली आणि सिंधुदुर्ग ह्या जिल्ह्यांची मिळून ''पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती'' नावाची शासकीय समिती आहे. ह्या समितीच्या अखत्यारीत तीन जिल्ह्यांतील ३,००० हजार मंदिरं आणि त्यांची २६,००० एकर जमीन आहे. ह्या जमिनी राजे-महाराजांनी आणि दानशूरांनी दिल्या आहेत. या जमिनींच्या उत्पन्नातून देवळाच्या देखभाल-दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध व्हावा, हा उद्देश दान करणाऱ्यांचा होता. दरम्यान, त्या जमिनी उत्पन्नासाठी ज्यांना कसायला दिल्या होत्या, त्यांनीच हडप केल्यात. परस्पर विकल्या. ह्या हडपेगिरीत देवळाच्या ब्राह्मण-भटांनी आघाडी मारली असून, त्यांना समिती सदस्यांनीही साथ दिली आहे.

अशी साथीदारी अयोध्येतील मंदिर घोटाळ्यात चंपत राय बन्सल यांचीही होती; म्हणून त्यांची ट्रस्टच्या सरचिटणीस पदावरून आणि अनिल मिश्रा, गोपाळ राव यांची विश्वस्त पदावरून हकालपट्टी झाली. हिंदीत ''चंपत''चा अर्थ गायब/फरार होणे, असा होतो. चंपत राय स्वतः गायब/फरार झाले नाही; मुद्देमालावर निभावले, हे बरेच झाले! या घोटाळ्यात संघ-भाजप परिवाराशी संबंधित लोक सापडावेत, हा योगायोग नाही; आणि अनपेक्षितही नाही. कारण त्यांची ट्रस्टवर नेमणूक बडा चौकीदार ''मोदी सरकार''ने केली होती. तसेच, रामलल्ला जागृत झाल्याने किंवा शंकराचार्यांना टाळून रामजन्मभूमी मंदिराचे उद्घाटन केल्याने त्यांची ''शापवाणी'' बाधली, असेही नाही. सत्ता सत्ताधारीचे खरे रूप दाखवते, हेच सत्य आहे. या प्रकरणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांनी संताप व्यक्त केलाय. पण त्यात जबाबदारी न स्वीकारता, कांगावा अधिक केला आहे. **''चढावा चोरी''चे हे प्रकरण ज्येष्ठ कारसेवक संतोष दुबे यांनी लावून धरले आहे. ''एसआयटी हा देखावा आहे. त्यामुळे खऱ्या गुन्हेगारांना शिक्षा होणार नाही. कारण ह्या प्रकरणी मुख्यमंत्री आदित्य योगी यांचे हात प्रधानमंत्र्यांनी आणि नागपूरच्या रेशीमबागेने बांधून ठेवले आहेत,'' हे संतोष दुबे यांचे म्हणणे खरेच आहे. कारण ह्या केंद्र सरकारच्या ताब्यातील ट्रस्टवर दरोडेखोरांची नेमणूक करणारे चौकीदार चिडीचूप आहेत. कारण तोंड उघडलं तर अब्जावधी रूपयांचा ''पी. एम. केअर फंड''चा हिशेब द्यावा लागेल, अशी भिती त्यांना वाटत असावी.**

देव-देवळं हा साधू-संन्यासी आणि भट-भिक्षुकांचा पोट भरण्याचा उद्योग आहे. भक्त-भाविक त्याची गिर्हाईकं आहेत. हा उद्योग 'संघ-भाजप' परिवाराने सत्तालाभासाठी आपल्या ताब्यात घेतलाय. म्हणजे, मुळातला खोटा धंदा सोंगाकडून ढोंगाकडे गेलाय. हे सोंगा-ढोंगाचे नाटक बिनदिक्कत चालू राहावे, यासाठी उमा भारती, आदित्य योगी यांसारख्या साध्वी-साधूंना राज्याचे मुख्यमंत्री बनवून परमार्थाचंही प्रदर्शन करण्यात आलेय. तथापि, ह्यातील मूळच्या खोटेपणाची हजामत करताना स्वामी विवेकानंद म्हणतात, ''हिंदुस्थानातील साधू-संन्याशांनी, पुरोहितांनी गरिबांसाठी काय केलं? त्यांना अध्यात्म शिकवलं! भुकेल्या माणसाला परमार्थ सांगणं, ही धर्माची शुद्ध चेष्टा आहे! आज लक्षावधी लोक अन्नान्न करीत आहेत. ही जनता परमेश्वर नाही का? भारताचे भवितव्य ह्या जनतेवर अवलंबून आहे!'' हे चौकीदारच चोर असतील तर कोणाला ऐकवायचं?

... ***ज्ञानेश महाराव***, (ज्येष्ठ पत्रकार- संपादक)
(प्रसिद्धी : दै. देशोन्नती व दै. आधुनिक केसरी/ रवि. ५ जुलै २०२६)

## कंड्या पिकवणारा बंड्या....

बंड्याने शाळेत असताना एकदा 'रोबो' (Robot) बनवलेला...त्याला मेडल पण मिळालेलं... आमचा बंड्या लै हुशार, बरं का! त्याचंच पेटंट गॅलगोतियाने वापरलं आणि कुत्रा बनवला...बंड्या त्याच्या गळ्यात पट्टा अडकवून 'I Summit' मध्ये मिरवायला लागला...भाषण करताना Teleprompter आणि विचार मांडताना डोक्यात कांदे भरलेले, म्हणून तो 'I' ची मदत घेता झाला.

बंड्या, खरंतरं एव्हढा हुशार होता की, शिक्षकांनी त्याला सांगितले की, तू सातवीच्या पुढे शिकूच नकोस बाळा...तू आपला शाळा सोडून जाऊच नकोस. पण बंड्याच तो, तो कसला ऐकतो...त्याने शिक्षकांचे काहीही ऐकले नाही. तो सरळ गटारात पाईप टाकून गॅसच्या शेगडीवर चहा बनवायला लागला...आणि, स्टेशन अस्तित्वात यायच्या आधीच, GDPची आकडेवारी दामदुप्पट फुगवण्यासारखी एकदम 'जादू' करुन, किटलीतून चहा स्टेशनवर (अदृश्य असलेल्या) विकूही लागला. त्यानंतर त्याला अंतराळ संशोधन करायची अनावर सुरसुरी आली...बांगलादेशावर जेव्हा पाकिस्तान फारच अन्याय-अत्याचार करु लागला; तेव्हा, बांगलादेशाच्या मदतीला बंड्या गेला...बरं, हे सगळं केल्यावर भारताला २०१४ साली स्वातंत्र्य बहाल करायलाही तो विसरला नाहीच!

अशा अनेक उचापती करता करता, त्याने गुजराथ (मेहसाणा-वडनगर) येथून हनुमानासारखं उड्डाण करत थेट दिल्ली गाठली...आणि, एक चमत्कार पुन्हा घडला. बंड्याने दिल्ली-विद्यापीठातून च ची डिग्री घेतली आणि मगच तो इ झाला...

पुढे जपजाप्य करत राहिला हर हर गंगे, नमामि गंगे आणि दुसरीकडे, गंगेसाठी प्राणार्पण करणाऱ्या जातिवंत साधुसंतांचे प्राण घेत राहिला!

# ।। जंतरमंतर येथे तरुणाईचा आश्वासक उद्रेक ।।

''नीट'' तसेच इतर परीक्षांच्या गोंधळाबाबत दिल्लीत तरुणाईने शांतपणे आंदोलन केले. या आंदोलनाची कार्यपद्धती, हाताळणी, परिणाम व नेतृत्व याबाबत मतभेद असू शकतात. परंतु या आंदोलनाने आपल्या देशातील शिक्षणव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

कालच्या आंदोलनास निमित्त होते ''नीट'' परीक्षेच्या पेपरफुटीचे! २०१४ ते २०२६ या १२ वर्षांच्या काळात देशात पेपरफुटीची एकूण १५२ प्रकरणे घडली असून त्यामुळे सुमारे ७.५ कोटी विद्यार्थी प्रभावित झाले आहेत. देशाची एकूण लोकसंख्या १५० कोटी आहे असे गृहीत धरले तर सुमारे ५% लोकसंख्या या पेपरफुटीमुळे संत्रस्त झाली आहे, असे म्हणता येईल.

ही तरुणाई ''नीट'' वा तत्सम प्रवेशपरीक्षा का देते? या तरुणाईला आपले भवितव्य घडवायचे आहे. शिक्षणव्यवस्था, अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, शिक्षणाचे बजेट, पुढारलेल्या देशांतील शिक्षणव्यवस्था याबाबत बहुसंख्य पालक अज्ञानी आहेत. ''चांगले शिक्षण मिळाले की, आपल्या मुलामुलींना चांगली नोकरी मिळेल'' एवढेच या पालकांना माहीत असते. याच उद्देशाने हे पालक मुलांना शिकवतात. तथापि, **आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी पालकांनी शैक्षणिक अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती व शिक्षणाचे बजेट यांकडे देखील तेवढ्याच तळमळीने पाहिले पाहिजे, वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून कालच्याप्रमाणे सरकारला जाब विचारला पाहिजे. तर आणि तरच तुमच्या मुलांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित राहील.**

भारतातील असंख्य पालकांना मुलांचा शिक्षणाचा खर्च परवडत नाही. शेतमजुरी–धुणीभांडी करून, मेहनत मजदूरीची कामे करून, वेळप्रसंगी पोटाला चिमटा काढून व स्वतःच्या गरजांमध्ये काटकसर करून हे पालक आपल्या मुलांना शिकवतात. फाटके कपडे घालून व तुटलेली चप्पल घालून मुलांच्या शिक्षणासाठी पै–पै जमवणारे पालक आपल्या आजूबाजूला दिसतील.

सर्वसामान्य जनतेमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झालेली असली तरी सरकारने मात्र शिक्षणाकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. मागील दहा वर्षांत जवळपास ९४,००० (चौऱ्याण्णव हजार) सरकारी शाळा बंद पडल्या आहेत किंवा त्यांचे शेजारच्या शाळांत विलिनीकरण केले आहे. लोकसभेत केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने माहिती दिली आहे की, **२०१४–१५ ते २०२३–२४ या दहा वर्षांच्या कालावधीत फुले शाहू आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील २,५०० सरकारी शाळा बंद पडल्या आहेत. नीती आयोगाच्या ताज्या अहवालानुसार महाराष्ट्रात २०२१–२२ ते २०२४–२५ या पाच वर्षांच्या काळात ८५० सरकारी शाळा बंद केल्याचे समोर आले आहे.**

एवढ्या मोठ्या संख्येने सरकारी शाळा बंद का होत आहेत ? याबाबत शासनाने शिक्षणतज्ज्ञांशी सल्लामसलत करून अथवा एखादी जबाबदार समिती नेमून यामागील कारणे जाणून घेतली आहेत का? तसेच ही कारणे नष्ट करण्यासाठी काही उपाययोजना केल्या आहेत का? शासन यांत्रिकपणे सरकारी शाळा बंद पडल्याची आकडेवारी का सांगते ? देशातील पहिली मुलींची शाळा १८४८ साली महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले यांनी चालू केली, हा महाराष्ट्राचा गौरवास्पद इतिहास आहे. त्याच महाराष्ट्रात सरकारी शाळा बंद होणे हे सरकारला शोभते काय?

चालू वर्षी आपल्या देशाचे एकूण बजेट ५३,४७,३१५/– कोटी एवढे आहे. अक्षरी रुपये त्रेपन्न लाख, सत्तेचाळीस हजार, तीनशे पंधरा कोटी ! त्यांपैकी शिक्षणासाठी १,३९,२८९/– कोटी (अक्षरी रुपये एक लाख एकोणचाळीस



हजार दोनशे एकोणनव्वद कोटी) एवढाच निधी खर्च होणार आहे. एकूण बजेटशी तुलना करता हा खर्च अवघा २.६९% एवढाच आहे! ज्या देशात मनुस्मृती लागू होती आणि ब्राह्मण जातीतील स्त्रियांना व समस्त ब्राह्मणेतरांना शिक्षण घेण्याची मनाई होती त्या देशात शिक्षणाचे बजेट एकूण बजेटच्या किमान २०% तरी असायला हवे. परंतु मनुस्मृतीच्या नावाने बोटे मोडणारे देखील शिक्षणाच्या या तोकड्या बजेटबाबत अवाक्षरही काढत नाहीत! शिक्षणाच्या बजेटवर बोलायला यांची तोंडे कोणी शिवली आहेत काय ?

**विकसित देशात शिक्षणावर जीडीपीच्या किमान ६% निधी खर्च केला जातो. २०२४–२५ या वर्षात भारताचा जीडीपी ४.५/– ट्रिलियन म्हणजे सुमारे ३५०/– लाख कोटी इतका होता. ३५०/– लाख कोटींचे ६% होतात २१/– लाख कोटी! म्हणजेच भारताने आपल्या शिक्षणावर कमीत कमी २१/– लाख कोटी खर्च करायला हवेत! यासाठी विद्यार्थी–पालक व देशहिताची काळजी असणाऱ्या सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. लोकशाही मार्गाने सरकारला जाब विचारायला हवा.**

अशा तऱ्हेने आपल्या शैक्षणिक समस्यांचे मूळ शिक्षणासाठी केल्या जाणाऱ्या अतिशय तोकड्या तरतुदीत आहे!

शिक्षणासाठी आपला देश अत्यंत जुजबी खर्च करीत असल्याने शैक्षणिक संस्थांची संख्या व त्यांची गुणवत्ता या दोन्ही बाबतीत आपण जागच्या फार मागे आहोत.

**सुमारे ३५ कोटी लोकसंख्या असलेल्या अमेरिकेत ४ वर्षांचा अभ्यासक्रम चालवणारी सुमारे ३००० विद्यापीठे आहेत व दोन वर्षांचा अभ्यासक्रम चालवणाऱ्या १५०० उच्च शिक्षण संस्था आहेत. म्हणजे सुमारे ३५ कोटींच्या अमेरिकेत सुमारे ४५०० विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्था आहेत.**

आपल्या देशाची लोकसंख्या १५० कोटींच्या आसपास आहे. सोईसाठी आपण ती १४० कोटी गृहीत धरू या. १४० कोटींच्या भारतात अवघी १,३३८ विद्यापीठे आहेत! लोकसंख्या आणि विद्यापीठे यांचे अमेरिकेतील प्रमाण विचारात घेतले तर भारतात किमान १८,००० विद्यापीठे हवी आहेत! हे झाले संख्यात्मक मागासलेपण!

देशात १८,००० विद्यापीठे उभारली तर देशातील तरुणाईला तिथे प्राध्यापक, प्रशासक, शिपाई अशा नोकऱ्या लागतील व बेरोजगारी कमी होईल! सरकारमध्ये बसलेल्या शिकल्या सवरल्या लोकांना हे कळत नाही का?

बरे, **देशात जी १,३३८ विद्यापीठे आहेत त्यापैकी एकही विद्यापीठ जगातील पहिल्या १०० विद्यापीठांत नाही ! जगातील पहिल्या २०० विद्यापीठांत भारतातील अवघी ३ विद्यापीठे आहेत; आयआयटी दिल्ली ११८, आयआयटी मुंबई १३४ व आयआयटी मद्रास १७०! हे आहे गुणवत्तेचे मागासलेपण!**

अशा तऱ्हेने जगाचा विचार करता आपण शैक्षणिक क्षेत्रात संख्या व गुणवत्ता या दोन्ही बाबतीत मागासलेले आहोत. या मागासलेल्या देशातील शिक्षणव्यवस्थेला परीक्षा सुद्धा ''नीट'' घेता येत नाहीत! शिक्षण क्षेत्रातील दुराचाराचे सर्वाधिक बळी आपल्याच देशातील तरुणाई होत आहे. अगदी आत्महत्या करण्यापर्यंत तरुणाई जाते तरीही आपल्या देशातील शैक्षणिक धोरणकर्ते मख्खपणे बसून राहतात. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो' या संस्थेने दिलेल्या माहितीनुसार मागील दहा वर्षांत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या प्रकरणांत ६५% वाढ झाली आहे. २०२२ मध्ये १३,०४४ तर २०२३ मध्ये १३,८९२ विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपवले. त्यातही अतीव दुःखाची गोष्ट म्हणजे फुले शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र विद्यार्थ्यांच्या आत्महत्येत पहिल्या क्रमांकावर आहे! त्यानंतर तामिळनाडू व मध्य प्रदेश यांचा नंबर लागतो.

शिक्षण मिळाले म्हणजे सर्व प्रश्न सुटले, असेही नाही. शिक्षण संपले तर बेरोजगारी मागे लागते. ती लागू नये म्हणून गुणवान मुलीमुलांचा व्यावसायिक शिक्षणाकडे ओढा वाढतो. म्हणून ''नीट'' परीक्षेचा 'इश्यु' होतो. परंतु बेरोजगारीचा प्रश्न हा मूलतः आर्थिक धोरणांशी निगडित आहे. रोजगार निर्मिती करणारे आर्थिक धोरण असेल तर बेरोजगारी कमी होते. परंतु आर्थिक धोरणेच बेरोजगारीला पूरक असतील तर सगळी तरुणाई शिक्षणाच्या मार्गातूनच आपले भविष्य निर्माण करण्याचा प्रयत्न करणार, हे उघड आहे. हेच शिक्षण महागडे केले अथवा तिथे दुराचार माजला तर तरुणाई किती काळ गप्प बसेल ? म्हणून या तरुणाईने आपले भविष्य सुरक्षित करण्यासाठी देशाच्या आर्थिक धोरणांकडे देखील लक्ष दिले पाहिजे ! त्यासाठी शैक्षणिक आंदोलनाला आर्थिक धोरणे तपासण्याची जोड देण्यात यावी!

जंतरमंतर येथे काल झालेल्या आंदोलनाचा हा मतितार्थ आहे. तो सर्वांना कळला असेल, अशी आशा आहे. अजूनही काहींना कळला नसेल तर आणखी काही काळाने तो देखील कळेल!

जसा कोरोना काळात आपल्या देशातील आरोग्यव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता, तसाच आता देशातील शिक्षणव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे!

त्याला ''नीट'' दिशा देऊन घटनात्मक चौकटीत त्याची सोडवणूक करण्यासाठी या टिप्पणाचे प्रयोजन!

*...शुद्धोदन आहेर*



# गुरुपौर्णिमा

**भारतातील पहिलावहिला पर्यावरणस्नेही हरित पक्ष अशी सर्वमान्य ओळख असलेला धर्मराज्य पक्ष आणि कष्टकऱ्यांची लढाऊ संघटना धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघ यांचे संस्थापक/अध्यक्ष मा. राजन राजे यांना गुरुपौर्णिमेनिमित्त शुभेच्छा देण्यासाठी व त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी, बुधवार, दि. २९ जुलै–२०२६ रोजी पक्षाच्या ठाणे येथील कार्यालयात निष्ठावान कार्यकर्ते, पदाधिकारी, कामगार सदस्य व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.**

आपल्या गुरूप्रती असलेली निष्ठा, आदर आणि प्रेम व्यक्त करण्यासाठी दिवसभर कार्यकर्त्यांचा ओघ सुरू होता. प्रत्येकाशी आत्मीयतेने संवाद साधत, त्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या सुख–दुःखाची विचारपूस करत मा. राजन राजे यांनी सर्वांना भरभरून आशीर्वाद दिले. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि कामगार सदस्यांच्या या प्रेमाने, ’कामगारहृदयसम्राट’ अशी ओळख असणाऱ्या मा. राजन राजे यांचे हृदयदेखील भारावून गेले होते. यावेळी मा. राजन राजे यांनी प्रस्थापित राजकीय व्यवस्था, अन्यायकारक व धनदांडग्या भांडवलदारी प्रवृत्तीविरोधात लढण्यासाठी सर्वांनी संघटित होऊन संघर्ष करण्याची गरज अधोरेखित केली. समाजातील वंचित, शोषित आणि कष्टकरी घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने लढणे, हीच खरी समाजसेवा असल्याचे त्यांनी उपस्थितांना सांगितले.

कामगार आणि शेतकरी हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून, तेच देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचेही आधारस्तंभ आहेत, याची जाणीव करून देत त्यांनी संघटित शक्ती, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताची भावना अधिक दृढ करण्याचे आवाहन केले. गुरुपौर्णिमेच्या या पावन दिवशी आपल्या मार्गदर्शकाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी उपस्थित राहिलेल्या सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, कामगार सदस्य व हितचिंतकांचे मा. राजन राजे यांनी मनःपूर्वक आभार मानले आणि न्याय, पर्यावरण, कामगार व शेतकरी हिताच्या लढ्यात अधिक जोमाने कार्य करण्याचा संदेश दिला.



Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०